cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१८० | शनिवार दि.१९ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### दिशा सालियान प्रकरणात आदित्यचा सहभाग नाही

मुंबई : दिशा सालियान प्रकरणामध्ये ठाकरेसेनेचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांचा कधीही सहभाग असू शकत नाही, असा ठाम विश्वास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी व्यक्त केला. माध्यमांशी संवाद साधताना, त्यांनी आपले मत मांडले. या प्रकरणाकडे कसे पाहावे हे मला समजत नाही, पण एक भाऊ म्हणून मी तुम्हाला सांगू शकतो की, आदित्य अशा कोणत्याही गोष्टीत कधीच सामील असू शकत नाहीत, अशी स्पष्टोक्ती अमित ठाकरेंनी करताना एका भावाच्या नात्याने आदित्य ठाकरेंची बाजू सावरली. राजकीय विरोधक जाणीवपूर्वक प्रतिमा मलीन करत असल्याचा आरोप आदित्य यांनी केला होता, ज्याला अमित ठाकरेंच्या वक्तव्याने दुजोरा मिळाला आहे.

### दिल्लीत दोन दिवस चिंतन बैठकीचे आयोजन

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यात केंद्रीय मंत्र्यांसोबत दोन दिवसीय 'चिंतन बैठक' घेणार आहेत. २३ आणि २४ सप्टेंबर रोजी ही बैठक होणार असून, सरकारच्या कामकाजाचा आढावा, शासन व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठीच्या सुधारणा आणि आगामी प्राधान्यक्रमांवर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. ही बैठक नेहमीच्या कॅबिनेट बैठकीपेक्षा वेगळ्या स्वरूपाची असणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मंत्र्यांचे विविध गट तयार करून त्यांच्यासोबत स्वतंत्रपणे वेगवेगळ्या विषयांवर चर्चा केली जाऊ शकते. शासन व्यवस्था, धोरणांची अंमलबजावणी, मंत्रालयांच्या कामकाजाचा वेग आणि सरकारी योजनांचा नागरिकांपर्यंत होणारा परिणाम यावर बैठकीत विचारमंथन होण्याची शक्यता आहे. धोरणांची निर्मिती करण्यापासून ते त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि त्यातून जनतेला मिळणारा लाभ याचा आढावा या बैठकीत घेतला जाणार असल्याचे वृत्त आहे.

### निठारी हत्याकांडा'तील कोळीची आत्महत्या

दिल्ली : संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या २००६ निठारी हत्याकांडातील सर्वोच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केलेल्या सुरेंद्र कोळीचा मृतदेह आज (दि. १८) हरिद्वारमध्ये आढळला. मागील काही महिन्यांपासून तो शहरात चहाची टपरी चालवत होता. येथेच त्याने जीवन संपवल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली. दिल्लीजवळील नोएडा येथील निठारी गावात अनेक महिला आणि मुले बेपत्ता झाल्याचे समोर आले होते. डिसेंबर २००६ मध्ये, मोनिंदर सिंग पांढेर याच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या एका गटारात मुले आणि महिलांचे अवशेष सापडले होते. सुरेंद्र कोळी हा पांढेरच्या घरी घरगडी म्हणून काम करत होता. या प्रकरणी कोळी आणि पांढेर या दोघांनाही पोलिसांनी २९ डिसेंबर २००६ रोजी अटक केली होती. त्यानंतरच्या काही दिवसांत, पोलिसांनी या हत्याकांडाचा तपास करताना आणखी अवशेष शोधून काढले. जानेवारी २००७ मध्ये हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले आणि त्यांनी १६ प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले. २००९ मध्ये, कनिष्ठ न्यायालयाने कोळी आणि पांढेर या दोघांनाही बलात्कार आणि हत्येप्रकरणी दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली. मात्र, ऑक्टोबर २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने कोळीची या सर्व १२ प्रकरणांतून, तसेच पांढेरची त्याच्यावरील दोन प्रकरणांतून निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाने ''पुराव्यांचा अभाव'' आणि तपास प्रक्रियेतील त्रुटींचा हवाला दिला.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,१०० | ३,१०० | २,८३५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९२.५० क्विंटल | ३,००१ | ५,७४५ | ४,१२१ |
| मका/लोकल: १३.०० क्विंटल | २,३०० | २,७४० | २,५२० |
| तूर : ३.०० क्विंटल | ८,१९० | ८,१९० | ८,१९० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ७,७३० | ७,७३० | ७,७३० |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,८०० | ३,००२ | २,९०९ |
| मुग: ९.०० क्विंटल | ९,००० | ९,६०१ | ९,२७९ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,६५१ | ६,२०० | ५,९८० |

# निकषांची प्रतीक्षा नको; दुष्काळ जाहीर करा!

**शरद पवारांचे मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र; कर्जमाफी, पीकविमा, चारा छावण्या आणि टँकर सुरू करण्याची मागणी**

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने खरीप पिके संकटात आली असून, शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत राज्यातील परिस्थितीकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. औपचारिक निकषांची प्रतीक्षा न करता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करावा, तसेच गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांना दुष्काळसदृश परिस्थितीग्रस्त घोषित करून तेथे दुष्काळी सवलती लागू कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.**



पावसातील खंडामुळे पिकांचे नुकसान होत असताना शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा देण्याची गरज असल्याचे पवार यांनी पत्रात म्हटले आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत जाहीर करावी. तसेच संकटग्रस्त शेतमजूर कुटुंबांना प्रत्येकी २५ हजार रुपये विशेष मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी योजनेची तातडीने अंमलबजावणी करून नव्याने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, असे पवार यांनी म्हटले आहे. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिले जाणारे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून एक लाख रुपये करावे. तसेच २०२५–२६ मध्ये पीककर्ज घेतले आणि यंदा ते थकीत झाले, अशा शेतकऱ्यांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करावा, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांना पीकविम्याचे प्रभावी संरक्षण मिळावे यासाठी एक रुपयात पीकविमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी. शेतकरी हिताचे यापूर्वी वगळलेले सर्व ट्रिगरही पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावेत, अशी मागणी पवार यांनी केली आहे. गेल्या वर्षी अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी जाहीर करण्यात आलेली हेक्टरी १७ हजार ▶▶ पान २ वर

# पंचनामे पूर्ण झाल्यावरच मदतीचा निर्णय

**सरकारकडून केवळ आश्वासनांचा पाऊस!**

**नागपूर । प्रतिनिधी**


**राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने खरीप पिके हातातून जाण्याची वेळ आली असताना, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याऐवजी सरकारकडून आता पंचनामे आणि अहवालांची प्रतीक्षा केली जात असल्याचे चित्र आहे. पीक नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच शेतकऱ्यांना किती मदत द्यायची, याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. १८) नागपुरात पत्रकारांशी बोलताना दिली. त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत कधी मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे.**



राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याचे महसूलमंत्र्यांनीच मान्य केले आहे. जिल्हाधिकारी, कृषी विभाग तसेच मदत व पुनर्वसन विभाग पंचनाम्याच्या आधारे कामाला लागल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, शेतकऱ्यांची पिके करपून जाण्याची वेळ आली असताना सरकारची यंत्रणा अजूनही सर्वेक्षण आणि अहवालांच्या प्रक्रियेतच अडकलेली असल्याचे दिसून येत आहे. प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असून अंतिम अहवाल आल्यानंतर कोणत्या उपाययोजना करायच्या, याचा निर्णय घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. मदतीसाठी केंद्र सरकारकडे काही प्रस्ताव पाठवावे लागतील, तसेच राज्यालाही काही मदत करावी लागेल, ▶▶ पान २ वर

# पाकिस्तान हादरलं!

**मशिदीबाहेर स्फोट;१५ जणांचा मृत्यू**



**इस्लामाबाद । वृत्तसंस्था**

पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात शुक्रवारच्या नमाजादरम्यान भीषण स्फोट झाला. पोलीस लाइन्स परिसरातील मशिदीजवळ झालेल्या या आत्मघाती स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला असून ५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. शुक्रवारी (१८ सप्टेंबर) ▶▶ पान २ वर

# औषध दुकानांमध्ये आता सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक!



**दिल्ली । वृत्तसंस्था**

देशातील औषध दुकानांमधून होणाऱ्या औषध विक्रीवर कडक नजर ठेवण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. औषध नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मंत्रालयाने मांडला असून, यानुसार आता सर्व औषध दुकानांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक केले जाऊ शकते.

शेड्युल एच, एच १ आणि एक्स या श्रेणींमध्ये येणाऱ्या औषधांची डॉक्टरांच्या वैध चिठ्ठीशिवाय (प्रिस्क्रिप्शन) होणारी बेकायदेशीर विक्री आणि गैरवापर रोखणे हा या दुरुस्तीचा मुख्य उद्देश आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने या प्रस्तावित नियमावलीचा मसुदा नुकताच राजपत्रात (गॅझेट) प्रसिद्ध केला आहे.या प्रस्तावावर सर्वप्रथम औषध सल्लागार समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर हा प्रस्ताव 'औषध तांत्रिक सल्लागार मंडळा'कडे पाठवण्यात आला होता. या विषयावर सर्वंकष विचारविनिमय केल्यानंतर डीटीएबीने प्रस्तावाला मंजुरी देण्याची शिफारस केली आहे. संवेदनशील आणि नियंत्रित औषधांच्या विक्री व वितरणावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी ही सीसीटीव्ही यंत्रणा एक अतिरिक्त सुरक्षा कवच म्हणून काम करेल. आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, सीसीटीव्ही देखरेखीमुळे औषधांच्या ▶▶ पान २ वर

# सहावीसाठी पुढील वर्षी त्रिभाषा धोरण लागू करा!

**दोन भारतीय भाषांसह तीन भाषा शिकणे बंधनकारक–सर्वोच्च न्यायालय**



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत असलेल्या तीन भाषा अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाला महत्त्वाची सूचना केली आहे. सहावीतील विद्यार्थ्यांसाठी दोन भारतीय भाषांसह तीन भाषा शिकणे बंधनकारक करण्याचे धोरण पुढील शैक्षणिक वर्षापासून म्हणजे २०२७ पासून लागू करण्याचा विचार करावा, असे न्यायालयाने सांगितले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. सीबीएसईतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी न्यायालयाला सांगितले की, मंडळ या सूचनेचा विचार करेल. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी सांगितले की, सध्या सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना यंदाच तीन भाषा शिकायच्या असतील तर त्यांनाही ती संधी देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. यावर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने या सूचनेचा अभ्यास करून ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रात घडलं तेच बंगालमध्ये घडलं

**तृणमूल काँग्रेसच्या दोन्ही गटांना नवे नाव नवे चिन्हं**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी या पक्षाच्या बाबतीत घडले अगदी तसेच बंगालमध्ये घडले आहे. निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधील अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना पक्षाच्या नावाचे आणि चिन्हाचे वाटप केले आहे. ममता बॅनर्जी यांच्या गटाला ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हे नाव दिले आहे. तर, ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाला डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस हे नाव देण्यात आले आहे. ममता बॅनर्जी यांच्या गटाला फुटबॉल प्लेअर आणि ऋतब्रत बॅनर्जी यांच्या पक्षाला लिफाफा चिन्ह देण्यात आले आहे.



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली होती. यानंतर दोन्ही गटांनी पक्षावर दावा केला होता. यानंतर प्रकरण निवडणूक आयोगाकडे पोहोचले होतं. यानंतर निवडणूक ▶▶ पान २ वर

# मराठीतला 'गोंधळ' 'ऑस्कर'च्या शर्यतीत !

**महाराष्ट्राच्या मातीतली कथा आता जगभर पोहचणार**

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची बातमी आहे. आगामी ऑस्कर २०२७ पुरस्कारांसाठी भारताकडून अधिकृत प्रवेशिका म्हणून मराठी चित्रपट 'गोंधळ'ची निवड करण्यात आली आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने ही घोषणा केली असून, या निवडीमुळे मराठी चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी मिळाली आहे.**




दिग्दर्शक संतोष डावखर यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या आणि डावखर फिल्म्स निर्मित 'गोंधळ'मध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाशी जोडलेल्या लोकपरंपरा, श्रद्धा, कौटुंबिक नाती आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संघर्षांचे चित्रण करण्यात आले आहे. पारंपरिक 'गोंधळ' या धार्मिक–सांस्कृतिक विधीला केंद्रस्थानी ठेवत चित्रपटाची कथा पुढे सरकते. त्यामुळे हा केवळ एका विधीचा किंवा ग्रामीण संस्कृतीचा आलेख न राहता मानवी नात्यांमधील ▶▶ पान २ वर

# २० दिवसांच्या उपोषणातून नेमकं काय मिळालं?

**जरांगे पाटील यांच्या उपोषण माघारीच्या भुमीकेवर विविध प्रश्न उपस्थित**

**जालना । प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांचा १२ व्या उपोषणाच्या सहाव्या दिवशी सरकारचे शिष्टमंडळ उपोषण सोडवण्यासाठी आले, पण मनोज जरांगे यांनी उपोषण सोडले नाही. तब्बल विसाव्या दिवशी पुन्हा सरकारचे शिष्टमंडळ आले आणि मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित झाले. पण आता दोन्ही सरकारी नोट्सची तुलना केली, तर काही आकडे बदलले, काही शब्द



बदलले, काही ठिकाणी कार्यवाहीचे नवे मुद्दे जोडले गेले, मात्र अनेक मागण्यांवरची मूळ भूमिका कायमच असल्याचे दिसते आहे. मग प्रश्न असा आहे की, जर सरकारचे उत्तर मोठ्या प्रमाणात तेच होते, तर जरांगे यांनी २० दिवस उपोषण करून आपल्या शरीराची झीज का करून घेतली? या २० दिवसांच्या उपोषणातून नेमके काय मिळाले? शब्द बदलले की निर्णय? आणि आश्वासनांपलीकडे प्रत्यक्षात काय बदलले? हे पाहणेही महत्त्वाचे आहे.

आधीच्या नोटमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील वितरित दाखल्यांची संख्या ३ लाख १६ हजार ९७७ होती. नव्या नोटमध्ये ती ३ लाख १३ हजार ८९७ करण्यात आली आहे. राज्याची आकडेवारीही ५१ लाख ८४ हजार ५३७ वरून ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# अंबानींच्या बाप्पाला समुद्राची विशेष परवानगी, इतरांच्या बाप्पासाठी कृत्रिम तलाव का?

## लाल कार्पेट श्रीमंतांसाठी आणि कृत्रिम तलाव सामान्यांसाठी?

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. श्रीमंत-गरीब, जात-पात, पक्ष-मतभेद यांच्या पलीकडे जाऊन लाखो भाविक या उत्सवात सहभागी होतात. त्यामुळेच गणेशोत्सवातील नियमही सर्वांसाठी समान असतील, अशी अपेक्षा स्वाभाविक आहे. पण विसर्जनाच्या नियमांभोवती निर्माण झालेला वाद आता एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारत आहेअंबानींच्या बाप्पाला समुद्रात विसर्जनाची विशेष परवानगी आहे का आणि सामान्यांच्या बाप्पाला कृत्रिम तलावच का? हा प्रश्न खासदार अरविंद सावंत यांचे स्वीय सचिव दीपक घोगल यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे त्याकडे केवळ राजकीय आरोप म्हणून नव्हे, तर प्रशासनाने स्पष्ट उत्तर द्यावे असा सार्वजनिक प्रश्न म्हणून पाहणे आवश्यक आहे.

यंदा मुंबईत गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत सहा फुटांचा निकष लागू आहे. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम जलसाठ्यात करायचे असून, सहा फुटांपेक्षा मोठ्या मूर्तींना नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जनाची मुभा आहे. नेही याच नियमाची अंमलबजावणी जाहीर केली आहे. मग प्रश्न अधिक नेमका होतो. नियमाचा आधार मूर्तीची उंची आहे की व्यक्तीची ओळख? जर उंची, मूर्तीचा प्रकार आणि पर्यावरणीय निकष हेच नियम असतील, तर ते प्रत्येकासाठी समान असले पाहिजेत. आणि एखाद्या विशिष्ट व्यक्तीला किंवा कुटुंबाला त्यापेक्षा वेगळी परवानगी देण्यात आली असेल, तर त्यामागील कायदेशीर आणि प्रशासकीय आधारही सार्वजनिक केला पाहिजे. मुंबईतील गिरगाव चौपाटीसह विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. गिरगाव चौपाटीवर कृत्रिम तलाव उभारण्यासाठी ने निविदाही काढली आहे. त्यामुळे पर्यावरणरक्षणासाठी कृत्रिम तलाव ही व्यवस्था सर्वसामान्यांसाठीच आहे, अशी भावना निर्माण होणे साहजिक आहे. गिरगाव आणि लालबाग परिसरातील मूर्तिकार व गणेश मंडळांनीही सहा फुटांखालील मूर्तींना समुद्रात विसर्जनाची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. पर्यावरणाचे संरक्षण आवश्यकच आहे. समुद्र, नद्या आणि नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी नियम असलेच पाहिजेत. पण पर्यावरणाच्या नावाखाली नियम बनवून ते सामान्य नागरिकांसाठी कठोर आणि प्रभावशालींसाठी वेगळे असतील, तर प्रश्न पर्यावरणाचा राहत नाही; तो समानतेच्या राज्यघटनात्मक तत्त्वाचा बनतो. अंबानी कुटुंबाला समुद्रात विसर्जनासाठी खरोखर काही विशेष परवानगी देण्यात आली असेल, तर ती कोणत्या नियमाखाली? परवानगी कोणी दिली? मूर्तीची उंची किती होती? ती परवानगी सर्व गणेशभक्तांना उपलब्ध आहे का? आणि नसेल तर त्याचे कारण काय? हे प्रश्न प्रशासनाने स्पष्ट करावेत. उलट अशी कोणतीही विशेष परवानगी नसून विसर्जन नियमांनुसारच झाले असेल, तर तेही स्पष्टपणे सांगण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्याला विरोध करण्यापेक्षा प्रश्नाचे उत्तर देणे महत्त्वाचे असते. कारण सामान्य माणसाच्या मनात निर्माण होणारा संशय दुर्लक्षित करून प्रशासन पारदर्शक राहू शकत नाही. एका भाविकासाठी समुद्र निषिद्ध आणि दुसऱ्यासाठी समुद्र खुला असेल, तर नियमांच्या समानतेवर प्रश्न निर्माण होणारच. आणि जर नियम सर्वांसाठी समान असतील, तर त्यांची अंमलबजावणीही समान दिसली पाहिजे. गणरायाच्या उत्सवातच जर आर्थिक ताकद, राजकीय जवळीक किंवा व्हीआयपी दर्जानुसार वेगवेगळे नियम असल्याची भावना निर्माण झाली, तर हा केवळ विसर्जनाचा प्रश्न राहणार नाही. तो राज्यव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न बनेल. पर्यावरण वाचवा, पण नियमांचा विश्वासही वाचवा. अंबानींच्या बाप्पाला विशेष परवानगी असेल तर तिचा आधार सांगा; नसेल तर विशेष सवलतीची चर्चा का निर्माण झाली, हे स्पष्ट करा. गणपती सर्वांचा आहे. त्यामुळे त्याच्या विसर्जनाचे नियमही सर्वांसाठी समान असले पाहिजेत. लाल कार्पेट कोणासाठी आणि कृत्रिम तलाव कोणासाठी, याचे उत्तर प्रशासनाने जनतेला देणे गरजेचे आहे.

## पान १ वरून...

**निकषांची प्रतीक्षा नको;**

रुपयांची पीकविमा मदत देखील तातडीने वितरित करावी, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

**टँकर, चारा छावण्या आणि रोजगार हमीची कामे**

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विशेष योजना राबवून शेती, जलसंधारण आणि इतर आवश्यक कामे सुरू करावीत. फळबागा वाचवण्यासाठी तातडीने टँकर व्यवस्था सुरू करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांचे तातडीने सर्वेक्षण करून गरजेनुसार शासकीय टँकर सुरू करावेत. त्याचबरोबर मागणीनुसार चारा छावण्या सुरू करून पशुधनासाठी पिण्याचे पाणी आणि आवश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे पवार यांनी म्हटले आहे. दुष्काळी परिस्थितीत वीजपुरवठ्याच्या समस्या वाढण्याची शक्यता असल्याने विद्युत रोहित्रांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी ऊर्जाविभागाच्या माध्यमातून विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रत्येक जिल्ह्यातील पर्जन्यमान, पिकांची स्थिती, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि पशुधनाची स्थिती यावर दररोज देखरेख ठेवण्यासाठी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली. दुष्काळसदृश परिस्थितीग्रस्त तालुक्यांतील शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये दुष्काळी सवलतींच्या नावाखाली केवळ परीक्षा शुल्क माफ न करता, विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी पवार यांनी केली आहे. शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण जनजीवनावर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही शरद पवार यांनी पत्रातून व्यक्त केली आहे.

-------------

**पाकिस्तान हादरलं!**

दुपारी नमाजासाठी मोठ्या संख्येने नागरिक मशिदीत जमले होते. त्याचवेळी पोलीस लाइन्स परिसरात हा स्फोट झाला. कोहाट डीएचक्यू रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक ताहिर अली शाह यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटानंतर १५ मृतदेह आणि ५० हून अधिक जखमींना रुग्णालयात आणण्यात आले. परिस्थिती पाहता रुग्णालय प्रशासनाने आपत्कालीन परिस्थिती जाहीर केली. पोलिसांच्या माहितीनुसार, मृतांमध्ये नागरिकांसह पोलिस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. स्फोटात अनेक नमाजासाठी आलेले नागरिक जखमी झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की मशिदीच्या बाहेरील भागाचे मोठे नुकसान झाले असून एक भिंत कोसळली. स्फोटामुळे मशिदीबाहेर जमिनीत मोठा खड्डाही पडला. आसपासच्या काही इमारतींचेही नुकसान झाले आहे. स्फोटाची माहिती मिळताच बचाव पथके, रुग्णवाहिका आणि अतिरिक्त सुरक्षा दल घटनास्थळी दाखल झाले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले असून जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले.या स्फोटामागे आत्मघाती हल्लेखोर असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मात्र, या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारलेली नाही. हल्ल्याचा नेमका उद्देश आणि स्फोटामागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून तपास सुरू आहे. स्फोटानंतर पोलीस लाइन्स परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे. तसेच कोहाट-हांगू मार्गावरील वाहतूकही तात्पुरती बंद करण्यात आल्याची माहिती आहे.

---------------

**पंचनामे पूर्ण झाल्यावरच**

असेही त्यांनी नमूद केले. मात्र, केंद्राकडे प्रस्ताव, अंतिम अहवाल आणि आकडेवारी यांची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शेतकऱ्यांनी नेमके काय करायचे, हा प्रश्न अनुत्तरित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाचा विषय प्राधान्याने घेतल्याचे सांगत महसूलमंत्र्यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिल्याचे नमूद केले. पालकमंत्री, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि आमदारांना आपापल्या भागातील परिस्थितीची पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, दुष्काळाची तीव्रता शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहण्यापेक्षा कागदोपत्री अहवालातून मोजली जात आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शेतकऱ्याला मजबूत उभे करायचे असेल तर संपूर्ण आकडेवारी आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. त्यामुळे सरकारच्या दृष्टीने सध्या शेतकऱ्याच्या संकटापेक्षा आकडेवारी महत्त्वाची ठरत आहे का, असा सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होण्याची शक्यता आहे. पिकांचे नुकसान दिवसेंदिवस वाढत असताना मदतीचा निर्णय मात्र अंतिम अहवालानंतर घेतला जाणार असल्याने शेतकऱ्यांच्या संयमाची परीक्षा सुरू असल्याचे चित्र आहे. दुष्काळाच्या काळात जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. मागील काळात चारा छावण्यांमध्ये भ्रष्टाचार झाल्याची कबुली देत बावनकुळे यांनी काही मक्तेदारांनी छावण्या चालवून गैरप्रकार केल्याचे सांगितले. यावेळी मात्र कोणताही भ्रष्टाचार होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मागील अनुभवातून धडा घेतला असल्यास चारा छावण्यांमध्ये गैरप्रकार होऊ नयेत यासाठी नेमकी कोणती पारदर्शक यंत्रणा उभारली जाणार, याचे स्पष्ट उत्तर अद्याप समोर आलेले नाही. दुष्काळग्रस्त भागात चारा छावण्या सुरू करण्याची वेळ आलीच तर त्यातील गैरप्रकार रोखण्याची जबाबदारी सरकारवरच राहणार आहे. दरम्यान, कृत्रिम पावसाबाबत विचारले असता, याआधी हा प्रयोग यशस्वी झालेला नसल्याचे बावनकुळे यांनी मान्य केले. त्यामुळे वैज्ञानिक उपायांपेक्षा आता सरकारची आशा पुन्हा एकदा परतीच्या पावसावरच असल्याचे दिसते. गणरायाकडे प्रार्थना केली असून आठवड्याच्या अखेरीस परतीचा पाऊस चांगला झाला तर दुष्काळाचे सावट काही प्रमाणात कमी होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. परतीचा पाऊस पडेल, अशी आशा ठेवणे वेगळे आणि शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यासाठी ठोस नियोजन करणे वेगळे. पाऊस आला तर संकट कमी होईल, या अपेक्षेवर सरकार किती काळ बसणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे. पिकांचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे, त्यानंतर अंतिम अहवाल, मग केंद्राकडे प्रस्ताव आणि त्यानंतर मदतीचा निर्णय या प्रदीर्घ प्रक्रियेत शेतकरी मात्र कर्ज, उत्पादन खर्च आणि पुढील हंगामाच्या चिंतेत सापडला आहे. राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याचे सरकारने मान्य केले आहे. मग शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यासाठी आणखी किती अहवालांची आणि किती प्रतीक्षेची गरज आहे, हा खरा प्रश्न आहे. दुष्काळाच्या संकटात सरकारच्या घोषणांपेक्षा शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत पोहोचणे महत्त्वाचे आहे.

----------------

**औषध दुकानांमध्ये आता**

बेकायदेशीर खरेदी-विक्रीवर नियंत्रण मिळवता येईल. तसेच औषध पुरवठा साखळीत (सप्लाय चेन) पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होईल. सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करणे आणि नियामक यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हा बदल प्रस्तावित करण्यात आला आहे. दरम्यान, या मसुद्यावर अंतिम निर्णय घेण्यापूर्वी मंत्रालयाने औषध क्षेत्राशी संबंधित घटक तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत.

---------------

**महाराष्ट्रात घडलं तेच**

आयोगासमोर १७ सप्टेंबरला दोन्ही गटांनी त्यांची बाजू मांडली होती. भारत निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेसचे नाव आणि चिन्हं गोठवले होते. यानंतर आयोगाने दोन्ही गटांना नवी नावे आणि चिन्हं सुचवण्यास सांगितले होते. ऋतब्रत बॅनर्जी आणि ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाकडे पश्चिम बंगालच्या पोटनिवडणुकीपूर्वी ३-३ नावे आणि चिन्हं देण्यास सांगितले होते. यानंतर निवडणूक आयोगाने नव्या नावांचे आणि चिन्हांचे वाटप केले. ऋतब्रत बॅनर्जी यांनी सामूहिक निर्णय घेत त्याप्रमाणे विचार करुन ३ नावे आयोगाला सोपवल्याचे म्हटले. आम्हाला डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस नाव आणि लिफाफा हे पक्षचिन्ह मिळाल्याचे ऋतब्रत बॅनर्जींनी म्हटले. निवडणूक आयोगासमोर ऋतब्रत बॅनर्जी यांच्या गटाकडून चंद्रिमा भट्टाचार्य, अकरुल जमान, अरुप रॉय यांच्यासह वकिलांनी बाजू मांडली गेली होती. ममता बॅनर्जी यांच्या गटाकडून डेरेक ओब्रायन, कल्याण बॅनर्जी, महुआ मोइत्रा, सागरिका घोष यांनी निवडणूक आयोगात बाजू मांडली. ममता बॅनर्जी यांच्या गटाकडून अंतरिम आदेश देण्यात येऊ नये, अशी भूमिका घेण्यात आली होती. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस हे नाव आणि दोन फूल आणि गवत असलेले चिन्हं वापरता येणार नाही, असा निर्णय घेत नवी नावे आणि चिन्ह कळवावे असे सांगितले होते.

----------

**सहावीसाठी पुढील वर्षी त्रिभाषा**

नव्याने भूमिका मांडण्याची तयारी दर्शविली. खंडपीठाने स्पष्ट केले की, न्यायालयाने केलेल्या सूचना या कोणत्याही पक्षाच्या अधिकारांवर किंवा दाव्यांवर परिणाम करणा-या नाहीत. या धोरणाशी संबंधित मूळ कायदेशीर प्रश्नांवर पुढील टप्प्यात निर्णय घेतला जाईल. यापूर्वी २७ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकेची दखल घेत केंद्र सरकार, सीबीएसई आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांना नोटिसा बजावल्या होत्या. सीबीएसईच्या परिपत्रकानुसार नववीतील विद्यार्थ्यांसाठी तीन भाषा शिकणे बंधनकारक केले आहे. या तीन भाषांपैकी किमान दोन ४भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, अरबी, स्पॅनिश यांसारख्या भाषा परदेशी भाषांच्या गटात येतात. यातील परदेशी भाषा शिकायची असल्यास प्रथम दोन भारतीय भाषा शिकणे आवश्यक असेल.

------------

**२० दिवसांच्या उपोषणातून**

५१ लाख ७१ हजार ७८१ अशी बदलली आहे. मात्र नव्या नोटमध्ये ९० दिवसांत कार्यवाही, पेनड्राइव्हद्वारे डेटा, जिल्हानिहाय नोडल अधिकारी आणि शिंदे समितीचा दौरा तातडीने सुरू करण्यास मान्यता असे अतिरिक्त मुद्दे जोडले आहेत. आधीच्या नोटमध्ये ३ हजार ९६६ अर्ज प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले होतं. त्यापैकी ३ हजार ८०६ दाखले वितरित, २५ अर्ज प्रलंबित आणि १३५ अर्ज नाकारले होते. नव्या नोटमध्ये अर्जांची संख्या ३ हजार ५५३, वितरित दाखले ३ हजार ३७२, प्रलंबित अर्ज ५०, तर नाकारलेले अर्ज १३१ असे आकडे आहेत. म्हणजे विशेष लक्षवेधी बदल म्हणजे प्रलंबित अर्ज २५ वरून ५० झाले आहेत. आधीच्या नोटमध्ये महाधिवक्त्यांकडे प्रस्ताव पाठवल्याबरोबरच ॲटोनॉमी जनरल यांचा अभिप्राय घ्यायचा का, कायदा विभागाचे मत आणि सातारा गॅझेटच्या ११७३ पानांचा अभ्यास करण्यासाठी ३० ते ४५ दिवस लागतील, असा सविस्तर उल्लेख होता. नव्या नोटमध्ये ३१ ऑगस्टला महाधिवक्त्यांकडे प्रस्ताव सादर केल्याचे आणि महाधिवक्ता मिलिंद साठे, स्पेशल कौन्सिल बिरेंद्र सराफ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र आधीच्या नोटमधील ३० ते ४५ दिवसांचा कालावधी आणि संदर्भातील सविस्तर मजकूर नव्या नोट मध्ये नाही. तर यासाठी ९० दिवसाची मुदत वाढ सरकारनं पूर्वीच्या मसुद्यातही मांडली होती आणि आत्ताच्या मसुद्यात ही मांडली आहे. मात्र गेली २० दिवस अपोषण आणि मुबई गाठण्याचा इशारा पहाता आंदोलनातून काय मिळालं हा प्रश्न आहेच हेच आश्वासन शिस्टमंडळाने अंतरवलीत दिले होत आता पाटोद्यात देखील तेच दिल त्यांनी वेळ मागितला आणि तीन महिन्याचा वेळ दिला तोच वेळ आंतरवलीत दिला असतात तर उपोषणाने शरीराची झिझ झाली नसती असे काही जाणकारांचे मत आहे.

-------------

**मराठीतला 'गोंधळ' 'ऑस्कर'च्या**

गुंतागुंत उलगडणारे कथानक म्हणून समोर येतो. चित्रपटाच्या कथानकाला कलाकारांच्या प्रभावी अभिनयाची जोड मिळाली आहे. किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू आणि सुरेश विश्वकर्मा यांच्या प्रमुख भूमिका चित्रपटात आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातील वातावरण, लोकजीवन आणि परंपरांचा पडद्यावर परिणामकारक वापर करण्याचा प्रयत्न चित्रपटातून करण्यात आला आहे. गोंधळ'च्या ऑस्कर प्रवेशामागे त्याच्या आधीच्या पुरस्कारांचीही महत्त्वाची पार्श्वभूमी आहे. चित्रपटाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये आपली छाप उमटवली आहे. पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'गोंधळ'ला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट छायाचित्रण असे दोन पुरस्कार मिळाले. त्यानंतर २२व्या थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल २०२६मध्ये संतोष डावखर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. चित्रपटाच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया. इंडियन पॅनोरमा विभागात मराठी चित्रपटाने तब्बल ५६ वर्षांनंतर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा 'सिल्व्हर पीकॉक' पुरस्कार मिळवल्याचा मान 'गोंधळ'ला मिळाला. त्यामुळे चित्रपटाची दखल केवळ प्रादेशिक पातळीवरच नव्हे, तर राष्ट्रीय चित्रपटविश्वातही घेतली गेली. याशिवाय झी चित्र गौरव पुरस्कार २०२६मध्ये 'गोंधळ'ने तीन पुरस्कार आपल्या नावावर केले. यामध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (पदार्पण), सर्वोत्कृष्ट छायाचित्रण आणि सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शक या पुरस्कारांचा समावेश आहे.मराठी चित्रपटांना यापूर्वीही ऑस्करच्या भारताच्या अधिकृत प्रवेशिकेच्या यादीत स्थान मिळाले आहे. 'श्वास', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आणि 'कोर्ट' या चित्रपटांनीही या प्रवासात महत्त्वाचे स्थान मिळवले होते. आता 'गोंधळ'च्या निवडीमुळे या परंपरेत आणखी एका मराठी चित्रपटाची भर पडली आहे. ऑस्करच्या अंतिम पुरस्कारापर्यंतचा प्रवास मात्र अनेक टप्प्यांतून जातो. भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड होणे हा या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असला, तरी त्यानंतर चित्रपटाला आंतरराष्ट्रीय निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागते. त्यामुळे आता 'गोंधळ' पुढील टप्प्यांमध्ये किती पुढे जातो, याकडे चित्रपटप्रेमींचे लक्ष लागले आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या लोकजीवनातील एका पारंपरिक सांस्कृतिक घटकाला केंद्रस्थानी ठेवून तयार झालेल्या या मराठी चित्रपटाची ऑस्करसाठी झालेली निवड ही मराठी चित्रपटसृष्टीसाठी निश्चितच महत्त्वाची घटना आहे.

-------------



## चकलांबा जि.प.माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील तीन शिक्षकांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

माध्यमिक शाळेतील सेवाज्येष्ठ उपक्रमशील गुणवंत माध्यमिक शिक्षक भगिनाथ बांगर, प्राथमिक शिक्षक रामदास आम्ले, आणि क्रीडा शिक्षक मोहन आहेर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन या शिक्षकांना गौरविण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक गर्कळ बी. एल. यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुरस्कारप्राप्त शिक्षकांची निवड केली आहे. या शिक्षकांचे शाळा व्यवस्थापन समिती, पदाधिकारी, सदस्य, शिक्षकवृंद ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## पान ६ वरून...

### शेतकरी कर्जमाफी

गेल्या अनेक दिवसापासून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे. सन २०२० पासून पिक विमा मिळालेला नाही. थातूरमातूर अनुदान दिले जाते. किमान शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली तर मोठा दिलासा मिळणार होता. मात्र लबाडाचे अवतान जेवल्याशिवाय खरं नाही या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ झाल्याशिवाय आणि त्यांना पुन्हा कर्ज मिळाल्याशिवाय कर्जमाफीचं काही खरं नाही अशी चर्चा आता गावागावातून होत आहे.

-----------

### छत्रपती संभाजीनगर

मराठवाड्यासाठी मंजूर केले आहे. शिवाय २०२४ साली सांगली कोल्हापूर जिल्ह्यातील अतिरिक्त पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. २००५ साली मंत्रिमंडळाने समन्यायी पाणी वाटपाच्या सुत्राप्रमाणे २३ टीएमसी पाणी उजनी धरणातून देण्याचाही निर्णय घेतला आहे. कृष्णा खोऱ्यातून धाराशिव, बीड, लातूर या कायम दुष्काळी जिल्ह्यासाठी देण्याचा निर्णय झालेला आहे परंतु अजूनही ठोस कार्यवाही होत नाही मराठवाड्याचा सिंचनाचा ६.१७ लक्ष हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे. या कामासाठी शासनाने सर्वेसाठी ५० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. या योजनेअंतर्गत गोदावरी खोऱ्यातील मुळा, भंडारदरा, मुकणे धरणात पाणी सोडण्याचे प्रस्तावित असून हे पाणी जायकवाडी धरणाच्या वरील भागात उपलब्ध करणे शक्य आहे. छत्रपती संभाजी नगर, बीड, हिंगोली या जिल्ह्यातील दुष्काळी भागास याचा उपयोग होणार आहे. या सर्व योजना शेतकऱ्याला उपलब्ध करून दिल्यास दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हे पाणी जीवनदायी ठरणार आहे. डॉक्टर अण्णासाहेब शिंदे समन्यायी पाणी वाटप समितीचे अध्यक्ष माजी आमदार विजय गव्हाणे, पंडित अण्णा शिंदे, जनार्दन तुपे, डॉक्टर सदाशिव पाटील, अशोकराव दापके, हट्टसिंग चौधरी, प्रकाश आहेर, सुभेदार श्रीबन, प्रकाश बापू ढुबे, कुमावत कडुबा, ज्ञानेश्वर वेताळ, एडवोकेट महादेव आंधळे सह शेकडो कार्यकर्ते या आदरणीय आंदोलनात उपस्थित होते. या आंदोलन स्थळी माजी खासदार हिंगोली चे शिवाजी माने, खासदार कल्याण काळे, माजी खासदार इम्तियाज जलील, आमदार बोरनाडे, खासदार संदिपान भुमरे, भाकपचे एडवोकेट अभय टाकसाळ,प्रा. मंगल खिवंसरा, साथी सुभाष लोमटे, जनता दलाचे भाऊसाहेब जाधव, डॉक्टर अफजल अजमल खॉ., अभियंता शंकरराव नागरे, शेतकरी संघटनेचे अडकट अजित काळे, सुभेदार मेजर श्री बन, आधार जलदूत महिला वैजापूर, अडवोकेट संजय काळबांडे, धाराशिव चे आमदार कैलास पाटील, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे माजी विरुद्ध पक्षनेते, वैजापूर ते नगराध्यक्ष दिनेश परदेशी अशा अनेक मान्यवरांनी मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळावे म्हणून या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दिला आहे.

----------

### घराघरांत जेष्ठा गौरीचे

गौरीला पुरणाचा नैवेद्य दाखविण्यात आला.नैवेद्यासह विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवून गौरीचे पूजन करण्यात आले. पूजेच्या वेळी महिलांनी पारंपरिक पद्धतीने आरती करून गौरीची मनोभावे पूजा केली. गौरीच्या आगमनामुळे दोन दिवस घराघरांत उत्साहाचे वातावरण होते. आज दि १९ सप्टेंबर शनिवार रोजी गौरी महापूजनानंतर ज्येष्ठा गौरीला निरोप देण्यात येणार आहे. गौरीच्या रूपात पार्वती आपल्या बाळाला म्हणजेच श्रीगणेशाला घेऊन जाण्यासाठी येते, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे माहेरवाशिणी गौरीच्या निरोपाच्या वेळी भावनिक वातावरण निर्माण होते.गौरी विसर्जनानंतर पुन्हा आपल्या घरी निघून जाते, अशी परंपरा असून यानिमित्ताने महिलांमध्ये भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

----------

### खा.सोनवणेंच्या मध्यस्थीने

खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१८ रोजी उपोषणकर्त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. या प्रकरणात तातडीने लक्ष घालून दोषींवर कायदेशीर व कठोर कारवाई करण्याचे निर्देश खा.सोनवणे यांनी यावेळी प्रशासनाला दिले.प्रशासनाकडून योग्य त्या चौकशीचे आणि कारवाईचे आश्वासन मिळाल्यानंतर, खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते सरबत पाजून गावकऱ्यांचे उपोषण सोडण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, पिंटू ठोंबरे यांची उपस्थिती होती.

---------------

### कवडगावच्या उपसरपंच पदी मकसूद

सरपंच बशिर भाई शेख नवनिर्वाचित उपसरपंच मकसूद अली साजेद अली शेख ग्रामविकास अधिकारी गिरी ग्रामपंचायत सदस्य सतीष सोनवणे ग्रा.प.सदस्य गोदावरी राऊत ग्रा.प.सदस्य मच्छिंद्र कानाडे ग्रा.पं.सदस्य कुशीवर्त लेंडाळ ग्रा.पं.सदस्य फातेमा शेख ग्रा.प.सदस्य शफीका बेगम मजहर अली शेख ग्रा.प. सदस्य सुमित्रा मांजरे ग्रा.प.सदस्य अनिल नांदुरकर ग्रा.पं.सदस्य गंगुबाई करेसह नागरिक युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच मकसूद भाई शेख यांचे सर्वच ग्रामपंचायत सदस्यांनी सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

--- -----------

### शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या आणि

करावा. संकटग्रस्त गावांना वेळेत पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. मात्र, टँकर प्रस्तावांना मंजुरी देताना मोठा विलंब होत आहे. हा विलंब दूर करण्यासाठी भूजल सर्वेक्षण यंत्रणेतील मनुष्यबळाची कमतरता तातडीने भरून काढावी, अशी आग्रही मागणी आ. क्षीरसागर यांनी या वेळी केली. वीज बिल माफी, चारा छावण्या आणि १००% पीक विम्याची मागणी ग्रामीण व शहरी भागात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यावर उपाययोजना करण्याची मागणी करत आ. क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी, जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता शेतकऱ्यांची विजेची बिले पूर्णपणे माफ करावीत. शेतकऱ्यांच्या पाल्यांची शालेय फी आणि जमीन महसूल माफी करण्यात यावी. पशुधनासाठी जिल्ह्यात तातडीने चारा छावण्या उभारण्यात याव्यात. ज्या ठिकाणी छावण्या नसतील, तिथे चाऱ्याची उपलब्धता करून द्यावी. आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना १००% पीक विमा आणि सरसकट कर्जमाफीच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य द्यावे. अशा मागण्या केल्या. शेतकरी आणि शेतकरी आणि नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आपला पाठपुरावा यापुढेही सातत्याने कायम राहील, असा निर्धार आ.संदीप क्षीरसागर यांनी या बैठकीनंतर व्यक्त केला आहे.

------------

### नागेश विद्यालयाच्या समितीवर

विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी, भौतिक सुविधांचा विकास आणि शालेय व्यवस्थापनाशी संबंधित विविध बाबींमध्ये समितीच्या माध्यमातून ते सक्रिय योगदान देणार आहेत. श्री नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके यांच्या हस्ते हाजी मुख्तार सय्यद यांना फेरनिवडीचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नियुक्तीमुळे विद्यालयाच्या विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा व सामाजिक कार्याचा निश्चितच उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. हाजी मुख्तार सय्यद यांच्या फेरनिवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष तथा आमदार रोहित पवार, राजेंद्र कोठारी, वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव, तहसीलदार राजेंद्र दराडे, हरिभाऊ बेलेकर, विनायक राऊत, विजयसिंह गोलेकर तसेच मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अझहरभाई काझी, नाझीम काझी, विजय काळदाते, नगरसेवक राजेंद्र गोरे, प्रसाद ढोकरीकर, इम्रान कुरेशी, परवेज खान, इस्माईल सय्यद, विजय कोठारी, कय्युम बागवान, जाफर सय्यद, सुनील कोठारी, मच्छिंद्र घनवट, जितेंद्र बोरा, अमित गंभीर, हसन तांबोळी, वसीम शेख, नासीर पठाण, सतीश होशिंग, धनराज पवार, नासीर सय्यद, संजय वारभोग, हमीद पठाण (पाटोदा) यांच्यासह श्री नागेश विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले. फेरनिवडीच्या निमित्ताने हाजी मुख्तार सय्यद यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

------------

### शिवसेना अल्पसंख्याक आघाडीच्या

हे दाखवून दिले होते. पुढे उद्धवसाहेब ठाकरे साहेब हे सुद्धा सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालत आहेत, उद्धवसाहेब हे सर्वांना आपले कुटुंबप्रमुख वाटत आहेत महाराष्ट्र राज्य गुण्यागोविंदाने उद्धवसाहेब साहेबच चालवू शकतात असा आता विश्वास पटला आहे. बीड शहर व जिल्हात मुस्लिम समाज खुप मोठ्या संख्येने आहे हा समाज आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे वळत आहे त्याचाच भाग म्हणून आज बीड जिल्हातून जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली संभाजीनगर उद्धव ठाकरे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या येथील जन आंदोल३नास बीड शहरातील किमान पाचशे मुस्लिम बंधू भगिनी आले आहेत याचाच अर्थ आता मुस्लिम बांधवांना शिवसेना पक्ष हा आपला वाटू लागला आहे. आज बीड शहरातील आयुब भाई यांच्याकडे शिवसेना अल्पसंख्याक चे ११ ही तालुक्याचे म्हणजेच सर्व जिल्हाचे जिल्हाध्यक्ष व यासमीन ताईकडे शिवसेना महिला आघाडी जिल्हाध्यक्ष पद मी देत आहे यामुळे आता येणाऱ्या काळात बीड शहरात व जिल्हात शिवसेनेची ताकद नक्कीच वाढल्याशिवाय रहाणार नाही असा मला विश्वास वाटतो. जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की, बीड जिल्हातील शिवसेना हि सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन मी यापुढे ताकदीने पुढे नेऊन पुन्हा एकदा बीड जिल्हा शिवसेनामय करण्यासाठी कटिबद्ध आहे. यावेळी नवनिर्वाचित शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष हाजी आयुब भाई पठाण व नवनिर्वाचित महिला अल्पसंख्याक जिल्हाध्यक्षपदी यास्मीन शेख यांनी आपल्या मनोगतात यापुढे बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिल असा विश्वास दिला. कार्यक्रमाला शिवसेना जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके,शेख शफिक उपसरपंच कामखेडा, शेख नवाब ,शेख इसार , शेख साजेद ,हाजी एजाज , डॉ. अब्दुल रहिम ,शेख जावेद, नाजेर पठाण,राजू महंमद,राजू बसीर, मुक्ती तालेप, शेख अबुजर, असमा ताहेर ,यासीन जावेद शेख, लैला शेख यांच्यासह मुस्लिम बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले.

-------------

### 'चेष्टा-मस्करीतही आक्षेपार्ह मजकूर

विशेष आरती पोलीस उपनिरीक्षक निलेश केळे यांच्या हस्ते पार पडली. आरतीनंतर त्यांनी उपस्थितांना ऑनलाइन फसवणूक, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचे धोके आणि सायबर गुन्ह्यांपासून बचावाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. ते म्हणाले सोशल मीडिया आणि एआय सारख्या आधुनिक प्लॅटफॉर्मचा वापर शैक्षणिक व प्रगतीकारक कामांसाठीच केला पाहिजे. सध्या डिजिटल विश्वात आर्थिक फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अनोळखी लिंक, संशयास्पद मेसेज, फेक कॉल्स किंवा कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी पडू नये. वैयक्तिक माहिती आणि ओटीपी कोणासोबतही शेअर करू नये. डिजिटल जगात सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येकाने 'सतर्कता, सुरक्षितता आणि जबाबदारी' या त्रिसूत्रीचा अवलंब करणे ही काळाची गरज बनली असल्याचे ते म्हणाले. आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांच्या नियोजनाखाली गणेशोत्सवातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात सुरू आहेत. या महोत्सवाला संस्थेतील विविध शाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

**शैक्षणिक वातावरण व सांस्कृतिक उपक्रमांचे कौतुक**

यावेळी केळे यांनी आदित्य शिक्षण संस्थेच्या भव्य, प्रशस्त आणि निसर्गरम्य शैक्षणिक परिसराचे कौतुक केले. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी एकाच कॅम्पसमध्ये एकत्र येऊन बंधुभावाने गणेशोत्सव साजरा करत असल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी साकारलेले सामाजिक संदेश देणारे देखावे आणि सजावट पाहून त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता अशा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी संस्था प्रशासनाचे अभिनंदन केले.

---------

## नवगण राजुरी येथे आज सप्ताहाची सांगता

नवगण राजुरी
मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे गणेश जन्म महोत्सवा निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज शनिवार दि. १९ रोजी श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ५ काकडा आरती, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी ३ ते ५ गणेशपुराण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन त्यानंतर भजन, भारुड झाले.असून यात ह.भ.प. जनार्दन महाराज शिंदे मत्सेंद्रगड, ह.भ. प. सुधाकर महाराज वाघ पैठण, रामकृष्ण महाराज रंधवे पाटोदा, दीपक महाराज बादाडे काडीवडगाव, पुष्कर महाराज गोसावी, राधाताई महाराज सानप महासांगवी, भरत महाराज जोगी परळी यांचे हरिकीर्तन संपन्न झाले. सोमवार दि. १४ रोजी श्री गणेशास गंगेच्या कावडीने जलाभिषेक घालण्यात आला. रात्री ११ ते १२ या वेळेत आरती, उपासना व गणेश जन्माचे भजन झाले. या सप्ताहाची सांगता आज शनिवार दि.१९ रोजी महंत शिवाजी महाराज श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसाद होईल तरी भाविक भक्तांनी या सप्ताहाच्या सांगतेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

# तहसीलदार रुईकर यांच्या कार्यकाळात माजलगावचं महसूल प्रशासन मुकं, बहिरं अन् आंधळं झालंय काय?

## मनुर शिवारातील सर्व्हे नं. २५ ची मोजणी करून हद्दखुणा निश्चित करा; अन्यथा २२ सप्टेंबरला आमरण उपोषणाचा सय्यद सलीमबापूंचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी
मनुर शिवारातील सर्व्हे नं.२५ मधील मिळकतीची मोजणी करून हद्दखुणा निश्चित कराव्यात,तसेच सदरील जमिनीशी संबंधित फेरफार व खरेदीखतांची चौकशी करावी,अशी मागणी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.या मागणीची दखल न घेतल्यास दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण बेमुदत उपोषण करण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.दरम्यान गरिबांच्या विरोधात असणारे तहसीलदार रूईकर यांच्या कार्यकाळात माजलगावचं महसूल प्रशासन मुकं, बहिरं अन्? आंधळं झालंय काय?असा प्रश्न ही विचारण्यात आला आहे.

मौजे मनुर,ता.माजलगाव येथील सर्व्हे नं.२५ मधील मयत भुजाबा महादू खांडेकर यांच्या नावावर असलेल्या ३ हेक्टर १६ आर जमीन आहे.सदर मिळकत हमालमापाडींची असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. मयत भुजाबा खांडेकर हे हमाल-मापाडीचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या नावावर सदर जमीन खरेदी करण्यात आली होती,मात्र,त्यानंतर या मिळकतीची बेकायदेशीर खरेदी-विक्री व फेरफार करण्यात आला आहे.सदर जमिनीवर एन.ए.लेआऊट करण्यात आला असून,सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखताद्वारे देण्यात आला आहे.अनेक हमाल अशिक्षित असल्याने त्यांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पीटीआर घेतली;मात्र ७/१२ उताऱ्याच्या मालकी हक्काच्या रकान्यात त्यांची नावे आली



नाहीत.भुजाबा खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांची नावे ७/१२ उताऱ्यावर कोणत्या आधारावर दाखल करण्यात आली,असा सवालही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.दरम्यान सर्व्हे नं.२५ बाबत करण्यात आलेले फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले,याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामसेवक,मौजे मनुर यांनी सदर मिळकतीबाबत किती पीटीआर दिले, याचे रेकॉर्ड मागवावे,दुय्यम निबंधक, माजलगाव यांच्याकडून सदर मिळकतीशी संबंधित सर्व खरेदीखते मागवून तपासावीत,तसेच तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांचे अहवाल मागवावेत,अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान सर्व्हे नं.२५ मध्ये बेकायदेशीर फेरफार करण्यासाठी तहसीलदार,मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या अर्थपूर्ण सहकार्याचा आरोप करत निवेदनात चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सर्व्हे नं.२५ ची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी,संबंधित पात्र हमालांच्या हक्काबाबत कायदेशीर कार्यवाही करावी आणि कथित चुकीच्या फेरफारांची चौकशी करावी,या मागण्यांसाठी सय्यद सलीमबापू यांनी प्रशासनाला निवेदन दिले आहे. निवेदनातील मागण्यांची दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास दि.२२ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने व कायद्याच्या चौकटीत आमरण बेमुदत उपोषण करण्यात येईल,असा स्पष्ट इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याहस्ते कार्तिकी मिसाळ सन्मानित

### आंतरराष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड



बीड। प्रतिनिधी
ब्राझील येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेल्या कु. कार्तिकी संदीप मिसाळ हिचा सत्कार महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते पार पडला, अशी माहिती तीचे प्रशिक्षक डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली.

रिओ डी जानेरो , ब्राझील येथे डिसेंबर महिन्यात होणाऱ्या '' वर्ल्ड स्कूल गेम्स २०२६ '' २०२६ साठी बीड ची राष्ट्रीय पदक विजेती तायक्वांदो खेळाडू कु. कार्तिकी संदिप मिसाळ हिची मुलींच्या + ६८ किलो वरील वजन गटामध्ये भारतीय संघात निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेली ती महाराष्ट्रातील एकमेव महिला खेळाडू आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने जिल्हा पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर शासकीय कार्यक्रमात कु. कार्तिकी संदिप मिसाळ हिचा उपमुख्यमंत्री, बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा क्रीडामंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी श्री विवेक जॉन्सन साहेब, अनेक लोकप्रतिनिधी, मान्यवर , जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर, डॉ अविनाश बारगजे व कार्तिकी मिसाळ हीचा संपूर्ण परिवार यावेळी उपस्थित होता. बीड जिल्हा संघटनेकडून देखील कार्तिकी मिसाळ हिचे जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे प्रशिक्षण केंद्राच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. जिल्हा संघटना, अ‍ॅकेडमीचे राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय खेळाडू, पालकांनी तीचे उत्स्फूर्त स्वागत करून तीचे या अभुतपुर्व कामगिरीसाठी अभिनंदन केले.

## वाद्यांना परवानगी नसेल तर विसर्जन नाही; गणेश मंडळांचा आक्रमक पवित्रा

### पारंपरिक वाद्यांसह बॅन्जोला परवानगी देण्याची मागणी; आष्टी पोलिसांना निवेदनातून थेट सवाल



आष्टी। प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील गणेश मंडळे तसेच सकल हिंदू समाजाच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांसह बॅन्जोला परवानगी देण्याची मागणी करण्यात आली असून, ''वाद्य नाही तर विसर्जन नाही'' अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे. याबाबत आष्टी पोलिस ठाण्याला निवेदन देण्यात आले आहे.आष्टी शहरातील गणेशोत्सवाला स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची परंपरा असून, काही मानाच्या गणपतींची शंभर वर्षांहून अधिक काळाची अखंडित परंपरा आहे. अशा ऐतिहासिक गणेशोत्सवात विसर्जन मिरवणुकीतील वाद्यांना विशेष महत्त्व असताना यावर्षी वाद्यांना परवानगी न देण्याची भूमिका का घेतली जात आहे, असा थेट सवाल गणेश मंडळांनी केला आहे.

''कायदा व सुव्यवस्था राखायची असेल तर नियम करा; मात्र नियमांच्या नावाखाली गणेशोत्सवाच्या परंपरेलाच का लक्ष्य केले जात आहे?'' असा प्रश्न निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. ध्वनिपातळी, वेळ, मिरवणुकीचा मार्ग आणि प्रशासनाने घालून दिलेल्या इतर कायदेशीर अटींचे पालन करण्यास मंडळे तयार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.पारंपरिक वाद्य वाजविणारे कलाकार आता अत्यंत कमी संख्येत उपलब्ध आहेत. त्यामुळे केवळ पारंपरिक वाद्यांचा आग्रह धरणे व्यवहार्य नसल्याचे मंडळांचे म्हणणे आहे. गणेश मंडळांना विश्वासात न घेता असा निर्णय घेण्याची गरज काय? प्रशासन आणि गणेश मंडळांमधील संवादाचा नेमका अर्थ काय? असे सवालही करण्यात आले आहेत.वाद्यांना पूर्णपणे नकार देण्याचा निर्णय कायम राहिल्यास लोकशाही व कायदेशीर मार्गाने या निर्णयाचा निषेध नोंदविण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने गणेश मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन पारंपरिक वाद्यांसह बॅन्जोला नियमानुसार परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गणेशोत्सव हा आमच्या श्रद्धेचा आणि परंपरेचा विषय आहे; तो केवळ प्रशासनाच्या परवानगीचा विषय समजला जाऊ नये,'' अशी ठाम भूमिका गणेश मंडळांनी घेतली आहे.

## तरुणांनो हातात दगड नव्हे, पुस्तक घ्या; मनात द्वेष नव्हे, विचार ठेवा

### सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात प्रसिद्ध गीतकार प्रशांत मोरे यांचे तरुणांना आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी
तरुणाई ही केवळ वयाची अवस्था नसून विचारांची ऊर्जा आहे. परिस्थिती कितीही अस्वस्थ करणारी असली तरी तरुणांनी दिशाहीन होता कामा नये. तरुणांनो हातात दगड नव्हे, पुस्तक घ्या मनात द्वेष नव्हे, विचार ठेवा स्वप्न पाहा, ज्ञान मिळवा, संघर्ष करा, अपयशातून शिका आणि आपल्या कर्तृत्वातून समाजाला दिशा द्या, असे आवाहन प्रसिद्ध गीतकार व व्याख्याते प्रा. प्रशांत मोरे यांनी केले.सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात ' वर्तमान परिप्रेक्ष्यात आजची तरुणाई'' विषयावर प्रसिद्ध गीतकार प्रा प्रशांत मोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी विजय सोळंके होते.यावेळी ॲड. बी. आर. डक, अण्णासाहेब वगरे, बाळासाहेब शिंदे, भीमराव टाकणखार, प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, कवी प्रभाकर साळेगावकर, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना प्रा.प्रशांत मोरे म्हणाले की,आजची परिस्थिती आव्हानात्मक असली तरी त्याला दोष देत बसण्यापेक्षा ती बदलण्याचे धाडस तरुणांनी केले पाहिजे. ज्ञान, विचार, विवेक आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःचे तसेच समाजाचे भविष्य घडवावे असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला त्याचबरोबर यावेळी मोरे यांनी बहारदार कविता सादर केल्या. याप्रसंगी ॲड. बी. आर. डक यांनी आजच्या तरूणाई व सद्यस्थिती याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अभय सोळुंके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले, तर आभार डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी मानले. व्याख्यानाला प्राध्यापक विद्यार्थी कर्मचारी उपस्थित होते.

## बोरमलनाथच्या विराट महामेळाव्यासाठी समाजबांधवांनी सहभागी व्हावे-हरी गिरी

माजलगाव। प्रतिनिधी
देवस्थान इनाम जमीन, इनामदार, पुजारी व सेवाधारकांच्या न्याय्य यहक्कांसाठी 'चला बोरमलनाथ!' या घोषणेअंतर्गत महाराष्ट्रातील विविध समाजघटकांच्या वतीने विराट महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा अखिल गुरव समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ऑड अण्णासाहेब शिंदे ,परशुराम हिंदू सेवसंघाचे अध्यक्ष विश्वजित देशपांडे ,दशनाम गोसावी परिषदेचे राज्य अध्यक्ष ओमप्रकाश गिरी ,मराठवाडा हक्क परिषदेचे अध्यक्ष एड. राजेंद्र बन यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. या महामेळाव्यास राज्यातील गिरी गोसावी समाज, सकल गुरव समाज, ब्राह्मण समाज, बैरागी समाज, वैष्णव समाज, घडसी समाज, कोळी समाज, लिंगायत समाज, फुलमाळी समाज, जंगम समाज तसेच अन्य समाजातील इनामदार, पुजारी व सेवाधारक वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली एकजूट दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता श्री बोरमलनाथ देवस्थान, चौफुला, ता. दौंड, जि. पुणे येथे हा विराट महामेळावा होणार आहे. देवस्थान इनाम जमिनीशी संबंधित प्रश्न, इनामदार, पुजारी व सेवाधारकांच्या हक्कांचे संरक्षण तसेच या समाजघटकांच्या न्याय्य मागण्यांसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.'आपल्या हक्कासाठी.आपल्या अस्तित्वासाठी. आपल्या न्यायासाठी!' या भूमिकेतून आयोजित करण्यात आलेला हा महामेळावा केवळ सभा नसून आपल्या हक्कासाठीचा एल्गार असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. 'एकजुटीने चला बोरमलनाथ, हक्कासाठी लढाएकजुटीने लढा' असा संदेश देत राज्यभरातील समाजबांधवांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.मानव विकास संस्था, शेलापुरी, ता. माजलगाव, जि. बीड संचलित नागराज बांधकाम तंत्र हस्तकला अध्यापक महाविद्यालय, तेलगाव, ता. धारूरचे अध्यक्ष हरी गिरी, प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, ह.भ.प. दत्ता महाराज गिरी, दशनाम गोसावी समाजाचे युवा नेते ज्ञानेश्वर गिरी, माजलगावचे बाजीराव गिरी, रवि बन, आसाराम गिरी, संजीव भारती, सुधाकर भारती, लता गिरी, सूर्यकांत गिरी, डिगंबर गिरी, महेश उद्धवराव गिरी, पुणे येथील संतोष पुरी, भीमाशंकर गिरी, विश्वांबर गिरी, पंकज पुरी, गणेश गिरी, सुभाष गिरी, बीड आदींनी हे आवाहन केले आहे.

## हुतात्म्यांच्या बलिदानातून घडला मुक्त मराठवाडा:सज्ञाद सय्यद

पाटोदा। प्रतिनिधी
महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, नायगाव येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ध्वजारोहण करून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस, सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ, व स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांची भाषण घेण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील शिक्षक श्री. सय्यद सज्जाद सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''मराठवाडा मुक्ती संग्राम हा आपल्या इतिहासातील महत्त्वपूर्ण स्वातंत्र्यलढा आहे. निजामशाहीच्या राजवटीविरुद्ध अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी धैर्याने संघर्ष केला. त्यांच्या त्यागा मुळे मराठवाडा भारतीय संघराज्यात विलीन झाला. बीड जिल्ह्यातील आणि पाटोदा तालुक्यातील अनेक स्वतंत्र सैनिकानी आपल्या जीवाचे बलिदान दिले. असे सांगून विद्यार्थ्यांनी देशभक्ती, व सामाजिक बांधिलकी ची भावना जोपासावी. असे सांगितले, मुख्याध्यापक सातपुते सर यांनी मराठवाडा मुक्ती दिनाच्या शुभेच्छा दिल्या.त्यानंतर प्रमुख पाहुण्याच्या वतीने बक्षीस वितरण करण्यात आले.

## एकनाथवाडी ग्रामपंचायत विकासकामांमध्ये ठेकेदारामार्फत घोटाळा झाल्याचा आरोप!

पाथर्डी। प्रतिनिधी
तालुक्यातील एकनाथवाडी ग्रामपंचायत हद्दीत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जा अपूर्ण कामे तसेच आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे याप्रकरणी अशासकीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य बाबा भगवान सानप यांनी विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांच्याकडे १० सप्टेंबर २०२६ रोजी लेखी तक्रार करून सखोल चौकशी व संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे तक्रारीनुसार एकनाथवाडी ग्रामपंचायत हद्दीत नदी दरा पाझर तलाव खोलीकरण गावांतर्गत गटार काँक्रीटीकरण धनगर वस्तीतील स्वच्छता केंद्रासाठी निधी कृष्ण महाराज मंदिर भिंत दुरुस्ती मायंबा देवस्थान सुशोभीकरण तसेच जिल्हा परिषद शाळेचे कंपाउंड आदी विविध कामे करण्यात आली आहेत.

मात्र यापैकी सर्व कामे निकृष्ट दर्जाची अपूर्ण अथवा नियमबाह्य पद्धतीने झाले आहेत असा आरोप आहे तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार




संबंधित कामे माजी सरपंच रोजगार हमी योजनेतील आरोपी नोंदणी क्रमांक ०२६ / २०१३ स्व.देविदास लिंबाजी खेडकर याचा भाऊ बाळासाहेब लिंबाजी खेडकर या ठेकेदारामार्फत करण्यात आली असून कामांची गुणवत्ता प्रत्यक्ष खर्च आणि शासकीय नोंदी यामध्ये अनियमितता असल्याचे दिसून येत आहे काही कामांमध्ये मंजूर निधीचा योग्य वापर झाला नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की संबंधित प्रकरणाबाबत यापूर्वीही प्रशासकीय तसेच न्यायालयीन पातळीवर बाबी मांडण्यात आल्या आहेत न्यायालयाने आरोपी देविदास लिंबाजी खेडकर याला दोषी धरत शिक्षा तसेच दंड ठोठावण्यात आला होता त्यामुळे या सर्व प्रकरणांमध्ये आरोपीच्याच कुटुंबाने पुन्हा एकदा भ्रष्टाचार केल्याने अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे क्वालिटी कंट्रोल अंतर्गत कामांची तांत्रिक तपासणी करून प्रत्यक्ष कामाची स्थिती खर्च मोजमाप पुस्तिका बिलांची देयके आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे तसेच ग्रामसेवक देखील यामध्ये सहभागी असल्याचे स्पष्ट होत आहे वरील सर्व प्रकरणाची शासनाच्या यंत्रणेमार्फत नियुक्त अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून दोशी आढळल्यास संबंधित ग्रामसेवक ठेकेदार किंवा अन्य जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते बाबा सानप यांनी केली आहे.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५९५**
**दिनांक - ०९/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती **जगन्नाथ नामदेव पारदे** रा. वलखेडा ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलगीच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | रेखा जगन्नाथ पारदे | मुलगी | ०५/०६/१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक-०९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०९९**
**दिनांक - ०९/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती **मधुकर कचरु राउत** रा. अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **नात च्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | राणी संतोष राउत | नात | २२/०६/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक-०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# पीक नुकसानीची काळजीपूर्वक नोंद करण्याचे निर्देश, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती

मुंबई

पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पीक कापणी प्रयोगात नुकसानाची काळजीपूर्वक नोंद करावी आणि नुकसानाची वस्तुस्थिती अचूक अहवालातून मांडली जाईल याची पूर्ण काळजी घ्यावी, असे निर्देश देण्यात आहेत. याबाबतची माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली आहे.

लातूर जिल्ह्यातील पाणी टंचाई आणि पीक परिस्थितीच्या आढावा बैठकीत जिल्हा प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या आहेत. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच याबाबत बैठक झाली. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देवून जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पांतील पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी विशेष पथके गठीत करावीत आणि सातत्यपूर्ण कार्यवाही करावी. महानगरपालिका, महावितरण, पोलीस आणि महसूलसह सर्व संबंधित विभागांनी



संयुक्त मोहीम हाती घेवून मांजरा धरणातून होणारा अवैध पाणी उपसा आणि लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनमधून होणारी पाणी चोरी रोखण्यासाठी प्रभावी कार्यवाही करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत. पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा संकट काळात बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची शासनाची भूमिका आहे. त्यामुळे पीक नुकसानाची काळजीपूर्वक नोंद करावी, असे सूचित केले आहे. शेतकऱ्यांसाठी पशुधन अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे पाणी टंचाईच्या काळात जनावरांच्या चाऱ्याचे योग्य नियोजन करून चारा टंचाईची स्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच चारा उपलब्धतेसाठी पशुसंवर्धन विभागाने आतापासूनच पशुपालकांना आवश्यक मार्गदर्शन करावे, असेही सांगण्यात आल्याचे सहकारमंत्र्यांनी नमूद केले. या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी जिल्ह्यातील पाऊस, सिंचन प्रकल्पातील पाणीसाठा आणि खरीप पिकांची सद्यस्थिती याबाबत सविस्तर माहिती सादर केली. तसेच महसूल उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या उपविभागातील संभाव्य पाणी टंचाई आणि उपाययोजना, पीक परिस्थितीची माहिती दिली. दरम्यान, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी, औसा तालुक्यातील बोरफळ येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली. अस्मानी संकटात सापडलेल्या बळीराजाला सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीत नव्याने पीककर्जाची गरज आहे. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये सिबिल व इतर तांत्रिक नोंदींमुळे पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमंजुरीत अडचणी येत आहेत. केवळ तांत्रिक कारणांमुळे शेतकरी नव्या कर्जापासून वंचित राहू नयेत. जिल्हाधिकारी अथवा शासन स्तरावरून संबंधित बँकांना स्पष्ट निर्देश देऊन या अडचणी दूर कराव्यात आणि शेतकऱ्यांना तातडीने नव्याने कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

## हरभरा लागवडीसाठी करा 'या' सुधारीत वाणांची निवड

हरभरा पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे आहे. हे पीक प्रामुख्याने रब्बी हंगामात घेतले जाते. सोयाबीनची कापणी केल्यानंतर बरेचसे शेतकरी हरभरा लागवडीसाठी सुधारीत वाणांची निवड पिकाची लागवड करतात. हरभरा पिकासाठी जमिनीची निवड महत्त्वाची आहे. हरभरा पिकासाठी मध्यम ते भारी काळी व निचरा होणारी जमीन असावी. सिंचनाची व्यवस्था असल्यास मध्यम प्रकारच्या जमिनीतही हरभरा पीक चांगल्या प्रकारे येऊ शकते.लागवड कधी करावी? :

२० ऑक्टोबरनंतर पावसाचे प्रमाण कमी झालेले असते आणि थंडीला सुरुवात झालेली असते, वातावरणात तापमानही जास्त असते अशात वातावरणात हरभऱ्याची पेरणी केल्यास उगवण चांगल्या प्रकारे होते. असे हवामान हरभरा पिकाच्या लागवडीसाठी योग्य असते. मात्र योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे असते.

विजय : अधिक उत्पादन क्षमता, मररोग प्रतिकारक जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे. तसेच हा वाण अवर्षण प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी जिरायतीसाठी ८५ ते ९० तर बागायतीसाठी १०५ ते ११० दिवस इतका आहे. या वाणापासून क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

विशाल : ११० ते ११५ दिवसात येणारा हरभऱ्याचा वाण असून जिरायतीसाठी १३ क्विं./हे. तर बागायतीसाठी २० क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम आहे. विराट : हा काबुली वाण आहे. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम असून याचे दाणे टपोरे आहेत. या वाणापासून जिरायतीमध्ये ११ क्वि./हे. तर बागायतीमध्ये १९ क्विं./हे. उत्पादन मिळते.

दिग्विजय : हा वाण जिरायतीसाठी ९० ते ९५ तर बागायतीमध्ये १०५ ते ११० दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये १४ क्विं./हे. तर बागायतीमध्ये २३ क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य असून मररोग प्रतिकारक आहे.

कृपा : हा १०५ ते ११० दिवसात येणारा वाण आहे. या वाणापासून सरासरी १८ क्विं./हे. उत्पादन मिळते. जास्त टपोरे व पांढऱ्या रंगाचे दाणे असणारा हा वाण आहे. फुले विक्रम : या वाणापासून जिरायतीमध्ये १६ क्वि./हे. तर बागायतीमध्ये २२ क्विं./हे. इतके सरासरी उत्पादन मिळते. या वाणाचा वाढीचा कल उंच असल्यामुळे यांत्रिक पद्धतीने (कंबाईन हार्वेस्टरने) काढणी करण्यास उपयुक्त आहे. या वाणाची उत्पादनक्षमता अधिक असून मर रोग प्रतिकारक आहे. फुले विक्रम हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे.



## तुरीच्या खोडावर चट्टे पडल्यास असे करा नियंत्रण



मागील हंगामात प्रामुख्याने मराठवाड्यामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून आला आहे. महाराष्ट्रात/मराठवाड्यात हा रोग पिकाच्या शाखीय वाढीच्या अवस्थेत उशिराने येताना दिसतो.

लक्षणे : फायटोप्थोरा ब्लाईटमुळे प्रथमतः खोडावर लंबगोलाकार परंतु टोकाकडे निमुळते होत गेलेले राखेरी चट्टे पडतात. कालांतराने तिथे खाच दिसायला लागते तसेच तेथील खोडाचा भाग फुगतो व गाठी पडतात त्या ठिकाणी धागेरी आकारदेखील तयार होतो. फांद्यावर व खोडावर अधिक प्रादुर्भाव झाल्यास डिंकासारखा चिकट पदार्थाचा स्त्राव ओघळू लागतो. खोड तपकिरी पडून करपते तसेच फांद्या देखील करपू लागतात. पावसाच्या काळात याचे प्रमाण वाढते.

असे करा रोग व्यवस्थापन : तूरपीक लागवडीसाठी समपातळीतील पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीमध्ये पाण्याचा निचरा होत नसेल तसेच चोपण किंवा चढ उतार उताराच्या जमिनीत पिकाची लागवड झाली असेल या ठिकाणी जमिनीतून उदभवणारे रोग जसे की फायटोप्थोरा, मर आणि मूळकुज इत्यादी बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून येतो. शेतामध्ये वनस्पतीचे कुजके अवशेष, काश्या, धसकटे व काडी कचरा असू नयेत. शेत आणि बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार होणार नाही.

उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी जेणे करून सूर्यकिरणांमुळे बुरशीचे बीजाणू नष्ट पावतील. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच जमिनीत तूर पीक घेऊ नये. शेताच्या चारही बाजूस चर काढावा जेणे करून शेतात पाणी साचून फायटोप्थोरा बुरशीची वाढ होणार नाही. पिकांची फेरपालट व आंतरपिकाचा शेतीत समावेश असावा जेणेकरून बुरशीच्या वाढीस आळा बसेल. बीजप्रक्रियेमध्ये जैविक बुरशीनाशकांचा वापर जसे की, ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स १० ग्रॅम प्रती किलो बियाणास वापरावे, अथवा बीज प्रक्रियेमध्ये १.५ ग्रॅम आंतरप्रवाही (उदा: कार्बेन्डाझिम) आणि २.५ ग्रॅम स्पर्शजन्य (उदा: थायरम) प्रती किलो बियाण्यास चोळावे. अथवा कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% या बुरशीनाशकाची ४.० ग्रॅम प्रती किलो याप्रमाणे बीज प्रक्रिया करावी. रोगाची लक्षणे दिसताच जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्सची २०० ग्रॅम/मिली प्रती १० लीटर पाणी याप्रमाणे रोगग्रस्त भागामध्ये आवळणी करावी.

रासायनिक बुरशीनाशकांमध्ये मेटाल्कझिल घटक फायटोप्थोरा बुरशीसाठी नियंत्रण म्हणून प्रभावी असल्याचे प्रयोगांच्या निष्कर्षावरून दिसून आले आहे.

## पावसाळ्यात शेळ्यांचे असे करा व्यवस्थापन

आपल्या देशात अनेक शेतकरी हे शेळीपालन करतात. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते. शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही, त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची दाट शक्यता असते. पावसाळ्यात आद्रतेचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे व्यवस्थापनात त्यानुसार बदल करणे गरजेचे आहे. यामुळे याबाबत माहिती असणे गरजेचे असते. यासाठी व्यवसायात असणारी जागरूकता महत्त्वाची असते.

अशी घ्या काळजी :शेळीच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचा ताण वाढणार नाही याची काळजी घ्यावी. कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशक औषधे द्यावीत. त्यामुळे कळप जंतमुक्त राहू शकेल. पाऊस पडल्यानंतर निर्माण झालेली आर्द्रता आणि उष्णता जंतांची अंडी, गोचीड वाढीसाठी अनुकूल असते. अशावेळी शेळ्यांच्या अंगावर गोचीड होतात. त्यामुळे शेळ्यांना रोग होतात गोचीड शेळ्यांच्या शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात.

अंगावर खाज सुटते, त्यामुळे शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते यावर उपाय म्हणून शेळ्यांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक औषध लावावे किंवा गोठा धुऊन घ्यावा. पावसाळ्याच्या दिवसात शेळ्यांना बाहेर सोडू नये.



पावसात जास्त वेळ शेळी भिजली की न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते. कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, जास्त प्रमाणात हा चारा खाल्यामुळे शेळ्यांना अपचन होते. पोटफुगी, हगवणीसारखे आजार होतात. पोटफुगी होऊ नये यासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते.

गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी उपाय :

शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही, त्या उष्णता सहन करू शकतात. गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी अथवा ६० वॉटचा विजेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठ्यातील मलमूत्र रोजच्या रोज साफ करून गोठा कोरडा ठेवावा गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसर पणा राहून पायाला फोड येतात, यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते अन अशक्त होतात.

लसीकरण महत्त्वाचे :आंत्रविषार होऊ नये म्हणून लसीकरण करावे. फुफ्फुसदाह आजार गोठ्यातील चुकीच्या व्यवस्थापनामुळे होतो. नियंत्रणासाठी लसीकरण महत्त्वाचे ठरते. लाळ्या खुरकूत आजाराचा प्रसार वेगाने होतो. यासाठी लसीकरण महत्त्वाचे ठरते. पावसाळ्यातच घटसर्प आणि फऱ्या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते खबरदारीचा उपाय म्हणून लसीकरण करून घ्यावे.

गाभण शेळीची योग्य काळजी : गाभण शेळीची पावसाळ्यात योग्य प्रकारे काळजी घ्यावी, पावसाळ्यात गोठ्याची जमीन ओलसर राहते, त्यामुळे चालताना घसरून पडणे हा प्रकार आढळतो त्यामुळे गर्भपात होण्याची शक्यता असते. पावसाळ्यात शेळ्या विण्याचे प्रमाण अधिक असते. या काळात गर्भाशयाचे तोंड उघडे असते, जर योनी भाग व बाजूचा भाग स्वच्छ नसेल, तर गर्भाशयात जंतूंचा शिरकाव होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी विल्यानंतर पाठीमागचा भाग गरम पाणी व सौम्य जंतुनाशकाचा वापर करून धुऊन काढावा. स्वच्छता ठेवावी.




### महत्वाच्या घटना

१८९३ : न्यूझीलंडमधे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.

१९५२ : विनोदी कलाकार चार्ली चैप्लिन यांना अमेरिकेत येण्यास मनाई करण्यात आली होती. त्यांच्या विरुद्ध देश विरोधी भावनाला प्रोत्साहन देण्याचा आरोप लावण्यात आला.

१९४६ : फ्रान्समधील कान्स येथे पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट समारोह झाला. दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे याला ७ वर्षे ऊशीर झाला.

१९५७ : अमेरिकेने पहिल्यांदा भूमिगत अणुबॉम्बचाचणी केली.

१९५९ : सुरक्षिततेच्या कारणास्तव रशियाचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांना अमेरिकेतील 'डिस्नेलँड'ला भेट देण्यास मनाई करण्यात आली.

१९८३ : सेंट किटस आणि नेव्हिसला स्वातंत्र्य मिळाले.

१९८५ : मेक्सिको देशांत झालेल्या विनाशकारी भूकंपामुळे सुमारे दहा हजार लोक मृत्युमुखी पडले होते.

२००० : भारताच्या करनाम मल्लेश्वरीने सिडनी ऑलिम्पिक स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये ६९ किलो वजन गटात ब्रॉन्झ पदक पटकावले आणि ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला बनली.

२००१ : महात्मा गांधींच्या मूल्यांचा ब्रिटनमध्ये प्रसार करणारे कार्यकर्ते व विचारवंत डॉ. सतीशकुमार यांना 'जमनालाल बजाज पुरस्कार' जाहीर

२००७ : टी २० क्रिकेट सामन्यातील एका षटकात सहा षटकार मारणारा युवराजसिंग हा पहिला खेळाडू बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५१ : हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २ ऑगस्ट १५८९)

१८६७ : शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (मृत्यू: ३१ जुलै १९६८)

१९११ : विल्यम गोल्डिंग नोबेल पारितोषिकविजेते इंग्लिश लेखक (मृत्यू: १९ जून १९९३)

१९१२ : भारतीय पशुवैद्य आणि प्राणीसंग्रहालय संस्थापक रुबेन डेव्हीड यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९८९)

१९१७ : अनंतराव कुलकर्णी महाराष्ट्रातील पुणे येथे झालेल्या पहिल्या मराठी प्रकाशक संमेलनाचे अध्यक्ष, उत्तम साहित्यिक प्रकाशक व कॉन्टिनेन्टल प्रकाशन संस्थेचे संस्थापक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९९८)

१९२५ : बाबूराव गोखले नाटककार व भावगीतकार (मृत्यू: २८ जुलै १९८१)

१९२७ : ज्ञानपीठ पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्याचे कवी कुँवर नारायण यांचा जन्मदिन.

१९५८ : लकी अली गायक, अभिनेता व गीतलेखक

१९६५ : भारतीय-अमेरिकन अंतराळवीर सुनिता विल्यम यांचा क्लीव्हलँड ओहायो अमेरिका येथे जन्म.

१९७७ : भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१० : डॅनिश खगोलशास्त्रज्ञ ओले रोमर यांचे निधन.

१७२६ : खंडो बल्लाळ चिटणीस छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम यांचे स्वीय सहाय्यक (जन्म:)

१८८१ : जेम्स गारफील्ड अमेरिकेचे २० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १९ नोव्हेंबर १८३१)

१९२५ : इंग्लिश वनस्पती वैज्ञानिक सर फ्रान्सिस डार्विन यांचे निधन.

१९३६ : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: १० ऑगस्ट १८६०)

१९६३ : सर डेविड लो जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार (जन्म: ७ एप्रिल १८९१ ड्युनेडिन, न्यूझीलंड)

१९८७ : नॉर्वे देशाचे पहिले पंतप्रधान एनर गेरहर्डेसन यांचे निधन. (जन्म: १० मे १८९७)

१९९२ : ना. रा. तथा अण्णासाहेब शेंडे साहित्यिक, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष (जन्म:)

१९९३ : दिनशा के. मेहता निसर्गोपचार तज्ञ, महात्मा गांधींचे आरोग्य सल्लागार व निकटचे सहकारी (जन्म:)

२००२ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (जन्म: १९ आक्टोबर १९५४)

२००४ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (जन्म: ५ सप्टेंबर १९२८)

२००७ : दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर ऊर्फ 'डी. डी' संगीतकार (जन्म: १५ नोव्हेंबर १९१७)

२०१४ : उप्पलपु श्रीनिवास (वय ४५) भारतीय सारंगी वादक

२०१८ : विष्णु खरे (वय ८६)भारतीय कवी आणि लेखक

# युपीआय शुल्क आकारने म्हणजे व्यापाऱ्यांना संपवण्याचा डाव

## निर्णय मागे न घेतल्यास व्यापारी महासंघाचा आंदोलनाचा इशारा



जालना । प्रतिनिधी

शासनाने १५ ऑक्टोबरपासून व्यापारी युपीआय व्यवहारांवर ०.४० टक्के शुल्क लागू करण्याचा घेतलेला निर्णय छोटे आणि मध्यमवर्गीय व्यापाऱ्यांना उद्‌ध्वस्त करणारा असून, शासनाने हा अन्यायकारक निर्णय त्वरित मागे न घेतल्यास राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) चे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी दिला आहे.

जालना येथील होलसेल किराणा मार्केटमध्ये व्यापाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शासनाने डिजिटल व्यवहारांवर लादलेल्या अतिरिक्त शुल्काबाबत व्यापाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सतीश पंच म्हणाले की, व्यापारी जितका नफा कमवत नाही, त्यापेक्षा जास्त कर वर्षभरात विविध मार्गांनी शासनाच्या तिजोरीत जमा करतो. व्यापाऱ्यांच्या ताळेबंदातून स्पष्ट दिसते की, त्यांना व्यवहारात नेमका किती नफा मिळतो. किरकोळ नफ्यावर चालणाऱ्या या व्यवसायातून जर ०.४० टक्के शुल्क कापले गेले, तर व्यापाऱ्याच्या हातात काहीच उरणार नाही. लहान-मध्यम व्यापाऱ्यांना संपवून हा सर्व व्यापार बड्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, जीएसटी लागू करताना इतर सर्व कर बंद करू असे आश्वासन शासनाने दिले होते. मात्र प्रत्यक्षात कोणताही कर कमी झाला नाही. आजही व्यवसाय कर, मार्केट कमिटीचा सेस, स्थानिक संस्था कर आणि परवाना शुल्क व्यापाऱ्यांकडून वसूल केले जात आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेला बळ देणारा आणि रोजगार निर्माण करणारा व्यापारी वर्ग नेहमीच देशाच्या प्रगतीसोबत उभा राहिला आहे. देशाला आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी व्यापारी सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहेत; मात्र शासनाने व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन, चर्चा करूनच निर्णय घेतले पाहिजेत. जर शासनाने व्यापाऱ्यांवर असा एकतर्फी आर्थिक भार लादणे सुरूच ठेवले, तर या धोरणाविरोधात रस्त्यावर उतरून लढा दिला जाईल, असेही सतीश पंच यांनी स्पष्ट केले. या बैठकीत व्यापाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रियदर्शनी बँकेचे सीईओ सचिन वाणी यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी युपीआय व्यवहारांविषयी सविस्तर माहिती देऊन सायबर गुन्हे आणि फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी व्यापाऱ्यांनी सतर्क राहावे, असे आवाहन केले. तसेच मराठवाडा अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनीही बैठकीत आपले मनोगत व्यक्त केले.या बैठकीस किशन भक्कड, दत्तप्रसाद लड्डा, पुरुषोत्तम अग्रवाल, रवी अग्रवाल,पियुष भक्कड, अनिल लड्डा, पृथ्वीराज भुरेवाल, प्रवीण कामड, मुकेश कुकडेजा, मुन्ना अग्रवाल, संतोष डागा व किराणा व्यापारी असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. बैठकीचे आभार प्रदर्शन किसन भक्कड यांनी केले.

## निघोना शिवारात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड; १४ जुगाऱ्यांवर कारवाई



जालना । प्रतिनिधी

निघोना शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून १४ जुगाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाईत जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व वाहनांसह एकूण २५ लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक श्री. तेजवीरसिंह संधू यांच्या पथकाला निघोना शिवारात काही जणांकडून झन्ना-मन्ना व तीन पत्ती नावाचा जुगार खेळविला जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार चंदनझिरा पोलिसांनी कारवाईचे नियोजन करून दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री २ वाजता जुगार अड्ड्यावर छापा टाकला.पोलिसांना पाहताच काही जुगारी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले, तर आठ जण पोलिसांच्या हाती लागले.

रात्री ०२:०० वा. छापा मारला असता तेथे जुगार खेळणारे पोलीसांना पाहुन कारवाईच्या भितीने पळुन जात असतांना पोलीसांनी १) विजय लक्ष्मणराव पुंगडवाले रा. निधोना २) राहुल विश्वनाथ शहापुरकर रा. निधोना ३) शेख मोसीन शेख इक्बाल रा. गांधीनगर जालना ४) अमजद रफिक सय्यद रा. गांधीनगर जालना ५) विजय कैलास खरे रा. कन्हैय्यानगर जालना ६) सुनिल संतुकराव निधोना यांना जागेवरच पकडले परंतु काही जण रात्रीच्या आंधाराचा फायदा घेवुन पळून जाण्यात यशस्वी झाले. पकडलेल्या इसमांचे ताब्यातुन जुगाराचे साहीत्य, रोख रक्कम, मोबाईल फोन व वाहने जप्त करण्यात आले आहेत. सदर ठिकाणाहुन पकडलेले आठ जण व पळुन गेलेले १) इसा शेख २) समिर पटेल ३) सुनिल शेजुळ ४) सुनिल म्हस्के रा. निधोना ५) विक्की रा. हिंद नगर जालना ६) संचिन मंडल रा. ढवळेश्वर यांचे विरुध्द पोलीस ठाणे चंदनझिरा येथे पोकों सागर खैरे यांचे फिर्याद वरुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोहेकों जोहरसिंग कलाणी हे करत आहेत. संबंधितांविरुद्ध चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजवीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे व सहकाऱ्यांनी केली. पुढील तपास पोलीस नाईक जोहेरसिंग कल्याणी करीत आहेत.

## अन्न व औषध प्रशासनाची दोन मिठाई विक्रेतावर कारवाई

### ८५५ किलो अन्नसाठा जप्त तर ५८ किलो साठा नष्ट

जालना । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने जालना शहरातील मिठाई विक्रेत्यांवर कारवाई केली. दोन मिठाई विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात संशयित व अस्वच्छ पद्धतीने साठवलेला अन्नसाठा जप्त करण्यात आला. याप्रकरणी एक लाख आठ हजार रुपये किमतीचा७९७ किलो अन्न साठा जप्त करण्यात आला असून सदरील आस्थापना बंद ठेवण्याचे आदेश दिले आहे .तसेच दुसऱ्या कारवाई १७ हजार ४००रु किमतीचा लेबल संबंधी दोष व अस्वच्छ ठिकाणी साठवून ठेवल्याला ५८ किलो साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने गांधी चौक परिसरातील आकाश नंदकिशोर अग्रवाल यांच्या पेढीची तपासणी केली. यावेळी मावा, हलवा व शेव या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच अस्वच्छ पद्धतीने साठवणूक व आवश्यक परवाना नसल्याचे निदर्शनास आल्याने मोठ्या प्रमाणात अन्नसाठा जप्त करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत मस्तगड येथील लक्ष्मी स्वीट्स या दुकानाची तपासणी करण्यात आली. येथे खाद्यपदार्थाचा नमुना घेण्यात आला तसेच मुदत व लेबलसंबंधी त्रुटी आढळल्याने साठवलेला अन्नसाठा जप्त करून नष्ट करण्यात आला.ही कारवाई सहायक आयुक्त (अन्न) निखिल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे-मुळे, विनोद ओसवाल व योगेश भिडे यांच्या पथकाने कारवाई केली.गणेशोत्सव काळात खाद्यपदार्थांची तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, योग्य साठवणूक तसेच परवान्याच्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करण्यात येत असून, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढील काळातही कारवाई सुरुच राहणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त निखिल कुलकर्णी यांनी दिली.

## शेतकऱ्याच्या पिकांच्या परिस्थितीचा संकलित अहवाल शासनास सादर-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता तसेच पावसाच्या खंडाचा पिकांच्या परिस्थितीवर परिणाम झाला आहे. १४ सप्टेंबरअखेर जूनपासून जिल्ह्यात झालेला एकूण पाऊस हा या कालावधीतील सरासरी पर्जन्यमानाच्या केवळ ८१.० टक्के झाला आहे. ऑगस्ट महिन्यातही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असून, सप्टेंबरमध्ये १४ तारखेपर्यंत सरासरीच्या केवळ ३३.१ टक्के पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खरीप पिकांच्या परिस्थितीची संयुक्त पाहणी करून जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.जिल्ह्यात निर्माण झालेल्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक ११ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीत खरीप हंगामातील पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या पिकांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.



त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी संयुक्त पीक पाहणी समित्यांची स्थापना करण्यात आली. या समित्यांमध्ये उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ व विषयतज्ज्ञांचा समावेश करण्यात आला.या संयुक्त समित्यांनी संबंधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष क्षेत्रभेटी करून विविध पिकांची सद्यःस्थिती, पावसातील खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, पिकांची वाढ व उत्पादनाची संभाव्य स्थिती आदी बाबींची पाहणी केली. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या संयुक्त पीक पाहणी समित्यांनी आपले अहवाल सादर केले असून, त्याआधारे जिल्ह्याचा संकलित प्राथमिक अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.शासन स्तरावर सदर अहवालाची आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शासनामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत. पिकांची सद्यःस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, पिकांची अवस्था आणि स्थानिक पर्जन्यमानाचा विचार करून कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. तसेच पीकविषयक कोणताही निर्णय घेताना कृषी विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून व तज्ज्ञांकडून प्राप्त होणाऱ्या सल्ल्याचा अवलंब करावा. जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन आवश्यक त्या उपाययोजना करीत असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्ती यांनी सांगितले आहे.

## कडबी मंडीतील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### १३ जण ताब्यात, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

सदर बाजार पोलिसांनी कडबी मंडी परिसरातील जुगार अड्ड्यावर कारवाई करून तब्बल १३ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन, चारचाकी/दुचाकी वाहने व जुगाराचे साहित्य असा एकूण सुमारे ३ लाख ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कडबी मंडी, जालना येथील मोहन चाट सेंटरच्या वरील इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील एका निवासी फ्लॅटमध्ये छापा टाकण्यात आला. या ठिकाणी काही व्यक्ती पैशांचा तिरट नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करून जुगार खेळणाऱ्या १३ आरोपींना ताब्यात घेतले.जीवन भगत ,संजय गोटे ,. दुर्गेश राजपूत ,सय्यद अहमद सय्यद नूर,. शेख अय्युब शेख ख्वाजा, अलकेश तुरे, करुण राजपूत ,इमारत उस्मान पठाण , शेख अशराफक शेख हमीद ,शेख अलीम शेख सलीम , भूषण विजयसेनानी,अय्युब अब्दुल खान , नयूर मोहनलाल अग्रवाल (या प्रकरणी महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून रोख रक्कम, विविध कंपन्यांचे मोबाईल फोन तसेच या दुचाकींसह इतर साहित्य जप्त करण्यात आले.या प्रकरणी महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने केली.

## मतदार यादीत आपले नाव तपासून नाव नसल्यास नमुना क्रमांक ६ भरून घ्यावे व नोंदणी करावी-जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण - २०२६ कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. नागरिकांना आपले नाव मतदार यादीत तपासण्यासाठी electoralsearch. eci.gov.in या संकेतस्थळावर मतदार ओळखपत्र क्रमांक, वैयक्तिक माहिती किंवा मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून शोध घेता येईल. तसेच voters.eci.gov.in या संकेतस्थळावर प्रारूप मतदार यादी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास नमुना क्रमांक ६ भरा. प्रारूप मतदार यादीमध्ये आपले नाव नसल्यास तसेच नवीन मतदार म्हणून नोंदणी करावयाची असल्यास नमुना क्रमांक ६ (घोषणापत्रासह) भरावा. हा अर्ज नागरिकांना voters.eci.gov.in या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन करता येईल. तसेच संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा संबंधित यांच्याकडे ऑफलाइन अर्ज सादर करता येईल,मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून, खालील दिवशी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. सर्व मतदान केंद्रे, सर्व तहसिल कार्यालये, शाळा व कॉलेजेस येथे विशेष शिबिरांचे पुढील प्रमाणे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार १९ सप्टेंबर २०२६, रविवार २० सप्टेंबर २०२६,शनिवार २६ सप्टेंबर २०२६,रविवार २७ सप्टेंबर २०२६ या विशेष मोहिमेदरम्यान नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रावर अथवा नियुक्त यांच्याकडे संपर्क साधून मतदार नोंदणीसाठी अर्ज करावा. मतदार यादीत नाव असणे ही मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ‘‘प्रारूप मतदार यादीत आजच आपले नाव तपासा‘‘, तसेच नाव नसल्यास विहित नमुन्यात अर्ज करून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घ्यावे.

## स्व. उत्तमराव पाटील कोल्हे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

जालना। प्रतिनिधी

गुरुपिंपरी : विद्यार्थ्यांनी कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यास करून यश अक्षरशः खेचून आणले पाहिजे. केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे हे ध्येय न ठेवता, आपल्या मनात यशाचे स्पष्ट ध्येय ठेवून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. पुढील वर्षी होणाऱ्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात आपलाही सत्कार व्हावा, या जिद्दीने विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन प्रा. राजेंद्र भोसले यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिक स्व.उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथील इयत्ता दहावीच्या परीक्षेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी विद्यालय संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रभाकर मामा पवार होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. राजेंद्र भोसले, उपस्थित होते. यावेळी स्वातंत्र्य सैनिक स्व.उत्तमराव कोल्हे यांचे चिरंजीव तथा माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहायक श्री. गोवर्धन उत्तमराव कोल्हे, अरविंद उत्तमराव कोल्हे, माजी सरपंच संतोष बप्पा कोल्हे, चेअरमन प्रल्हाद आण्णा कोल्हे, उपसरपंच सुनील कोल्हे, मुख्याध्यापक बी.आर. कडूळे सर, शिक्षक आर.जी.थोरात आर.एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. गायत्री संदीप कोल्हे हिचा ₹३,१००, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. सृष्टी संतोष कोल्हे हिचा ₹२,१००, तर तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या कु. स्वाती परमेश्वर वाघमारे हिचा ₹१,१०० रोख पारितोषिक, सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.स्वातंत्र्यसैनिक स्व. उत्तमराव गणपतराव पाटील कोल्हे यांनी हैदराबाद संस्थानातील नागरी अवज्ञा आंदोलनात सक्रिय सहभाग, निजामाच्या आदेशांना अहिंसक पद्धतीने विरोध करणे, सत्याग्रह करणे, जनजागृती करणे, राष्ट्रध्वज फडकाविणे आणि लोकशाही अधिकाराची मागणी करणे अशा विविध मार्गाने निजामशाही विरुद्ध आवाज उठविला होता. निजाम सरकारने त्यांना अटक करून कारावासात ठेवले होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सुमारे दीड वर्ष कारावास भोगला. त्यांच्या त्याग, धैर्य आणि देशप्रेमाची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड, गुणवत्तेची जिद्द आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.यावेळी प्रल्हाद काका कोल्हे, सतीश कोल्हे, सत्तू आण्णा कोल्हे, सवाराम कोल्हे, नारायण कोल्हे, कृष्णा कोल्हे, प्रल्हाद कोल्हे, विष्णुपंत कोल्हे, अविनाश कोल्हे, विलास कोल्हे, परमेश्वर कोल्हे, सुनील कोल्हे, बाळासाहेब कोल्हे, कैलास कोल्हे, अनिल कोल्हे, विनोद खंडागळे, दत्ता पाटील कोल्हे, गणेश कोल्हे, इंद्रराव कोल्हे, सचिन कोल्हे आदींसह ग्रामस्थ, पालक, शिक्षक, विद्यार्थी व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे प्रश्नांवर खा. डॉ. कल्याण काळे यांचा आक्रमक पाठपुरावा

## मुकुंदवाडी गेट क्र. ५६ सह २० महत्त्वाच्या मागण्यांवर कालबद्ध कार्यवाहीची मागणी



जालना। प्रतिनिधी

जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या सुविधा, रेल्वे सुरक्षा, नवीन रेल्वे सेवा, पायाभूत सुविधा, औद्योगिक मालवाहतूक तसेच प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी नांदेड येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी रेल्वे विभागाकडे यापूर्वी करण्यात आलेल्या विविध मागण्यांचा आढावा घेत प्रत्येक विषयावर तातडीने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देशात्मक स्वरूपात आवाहन केले.

खासदार डॉ. काळे यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना दोन स्वतंत्र पत्रे प्रत्यक्ष सुपूर्द केली. यामध्ये मुकुंदवाडी येथील रेल्वे गेट क्र. ५६ येथे / उभारण्याच्या प्रलंबित प्रस्तावाला अंतिम मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा विषय विशेषत्वाने मांडण्यात आला. रेल्वे गेट वारंवार बंद होत असल्याने नागरिक, विद्यार्थी, कामगार, रुग्ण आणि व्यावसायिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ प्रशासकीय पत्रव्यवहार न करता या कामासाठी आवश्यक मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष बांधकामाची निश्चित कालमर्यादा ठरवावी, अशी स्पष्ट भूमिका खासदार डॉ. काळे यांनी मांडली.‘‘नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाहीत. प्रस्ताव कोणत्या स्तरावर आहे यापेक्षा प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, हे महत्त्वाचे आहे,’’ अशी भूमिका त्यांनी चर्चेदरम्यान स्पष्ट केली.

जालनाछत्रपती संभाजीनगर परिसरातील प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन वंदे भारत एक्स्प्रेस, जालनाछपरा रेल्वे सेवा, पूर्णापटना रेल्वे छत्रपती संभाजीनगरपर्यंत वाढविणे, अजंता एक्स्प्रेस मुंबईपर्यंत विस्तारित करणे तसेच जालनानगरसोल मनमाडपर्यंत वाढविणे, या मागण्यांवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच छत्रपती संभाजीनगरजालना दरम्यान नियमित शटल सेवा सुरू करण्याबाबत व्यवहार्यता तपासून प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली. मराठवाड्यातील नागरिकांना मुंबई, पुणे, सूरत, अहमदाबाद, नागपूर, मडगाव, कोल्हापूर आणि नाशिकसह प्रमुख शहरांशी अधिक चांगली रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळावी, यासाठी नवीन रेल्वे सेवा व अतिरिक्त फेऱ्यांचा प्रस्ताव तयार करण्याची मागणीही त्यांनी केली.गणेशोत्सवाच्या काळात मराठवाडाकोकण रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी नांदेडहडपसर गणपती विशेष रेल्वे सावंतवाडी रोडपर्यंत वाढविण्याची मागणीही खासदार डॉ. काळे यांनी यापूर्वी केली आहे.

## अधीक्षक कार्यालय, लातूर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा



लातूर । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त लातूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात आज सकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी ध्वजारोहण करून मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला.पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच नागरिकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.मराठवाडचाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन करण्यात आले.

# शेतकरी कर्जमाफी ही घोषणा फसवी

## सरकार म्हणते कर्जमाफी दिली; तर बँकांकडून कर्ज भरण्यासाठी तगादा

**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने मोठा गाजावाजा करत कर्जमाफी दिल्याची घोषणा केली त्याची एक यादी प्रसिद्धी झाली. मात्र यात पंचवीस टक्केही शेतकऱ्यांची नावे नाहीत. नंतर दोन याद्या प्रसिद्ध होतील असे सांगण्यात आले. मात्र याला महिना उलटला तरी पुढच्या याद्या प्रसिद्ध झाल्या नाहीत. बँकेकडून मात्र शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी फोन आणि संदेश सुरू झाले आहेत. नेमकी ही कर्जमाफी खरी की खोटी असा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे. सरकार आपल्याला गंडवतय काय? अशी शंका शेतकऱ्याच्या मनात निर्माण झाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून शेतकरी नेते विशेषतः आ. बच्चू कडू हे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पाठपुरावा करत आहेत. आमदार बच्चू कडू यांनी तर अमरण उपोषणही केले. मात्र त्यांना त्यावेळी कर्जमाफीचा शब्द देण्यात आला शब्द देऊनही अनेक महिने कर्जमाफीसाठी सरकारने टाईमपास केला. या कर्जमाफीसाठी अनेक संघटनांनी उपोषणे आंदोलने केली. मात्र सरकारला घाम फुटला नाही. मात्र अचानक सरकारला कर्जमाफीची आठवण झाली आणि कर्जमाफीची घोषणा मंत्रिमंडळाच्या बैठकीत करण्यात आली. ही कर्जमाफी झाल्यानंतर त्वरित पुन्हा शेतकऱ्यांना कर्ज मिळेल असे ठासून सांगण्यात आले. मात्र कर्जमाफीची यादी प्रसिद्ध होताना केवळ २५% शेतकऱ्यांना कर्जमाफी



झाल्याचे यादी वरून स्पष्ट होत आहे. इतर शेतकऱ्यांसाठी आणखी दोन याद्या प्रसिद्ध होतील असे सांगितले जात होते. मात्र एक महिना झाला तरी या याद्या प्रसिद्ध झाल्या नाहीत. बँकांकडून मात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी फोन केले जात आहेत. संदेश पाठवले जात आहेत. नेमकी कर्जमाफी कोणाची झाली असा प्रश्न या निमित्ताने शेतकऱ्यांना पडत आहे. सरकार आपल्याला फसवतय काय? असा संशय शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे. जर कर्जमाफी केली तर मग बँकांकडून कर्ज भरण्यासाठी फोन कशासाठी येतात. ते संदेश कशासाठी पाठवतात? असा सवाल शेतकऱ्यांमधून केला जात आहे. ही कर्जमाफी खरी असेल तर मग सर्वांना याचा लाभ का मिळाला नाही? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. सरकार केवळ घोषणा करून आपली पाठ थोपटून घेते आहे काय? असाही सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. कर्जमाफी करायची असेल तर सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज दिले पाहिजे. मात्र हे होताना दिसत नाही. सरकार शेतकऱ्यांना आणखी किती दिवस गंडवणार असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.

▶▶ पान २ वर

# घराघरांत जेष्ठा गौरीचे उत्साहात पूजन



**माजलगाव | प्रतिनिधी**

**नक्षत्रावर घरोघरी ज्येष्ठा अर्थात महालक्ष्मीचे आगमन झाल्यानंतर दि १८ सप्टेंबर शुक्रवार रोजी महिलांकडून ज्येष्ठा गौरीचे उत्साहात पूजन करण्यात आले. दोन वर्षांच्या कालखंडानंतर यंदा सणाचा अधिकच उत्साह दिसून आला. गणपतीपाठोपाठ कनिष्ठा अर्थात महालक्ष्मी माहेरी येत असल्याने गुरुवारी घरोघरी महालक्ष्मी विराजमान झाल्या.**

शुक्रवारी गौरी पूजन असल्याने सकाळपासूनच महिलांची लगबग सुरू होती. घरासमोर आकर्षक रांगोळी काढून महिलांनी महालक्ष्मीच्या पूजनासाठी घराची सजावट केली.यावेळी पाना-फुलांसह विविध सजावटीच्या साहित्यांनी तसेच विद्युत रोषणाईने परिसर सजविण्यात आला.शुक्रवारी गौरीचे पूजन करून

▶▶ पान २ वर

## मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप करा-प्रा.सुशीलाताई मोराळे

# छत्रपती संभाजीनगर येथे आज धरणे आंदोलन

**बीड | प्रतिनिधी**

मराठवाडा महाराष्ट्रातील सर्वात जास्त मागास विभाग म्हणून ओळखला जातो हे मागासले पण शिक्षणात, आरोग्यात, सिंचनात दिसून येते, मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष खूप मोठा आहे. परंतु पाटबंधारे विभागातील घोटाळ्यानंतर किती जमीन ओलिताखाली आहे हे श्वेत पत्रिकेत दाखवलेच जात नाही. मराठवाड्याचा पाण्याचा अनुशेष




खूप मोठा आहे. हा अनुशेष भरून काढण्याच्या सूचना राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांनी जाहीरपणे बोलून सांगितले होते तसेच वैधानिक विकास मंडळानेही हा अनुशेष सांगितला होता परंतु ही महामंडळेच सरकारने मोडून काढली आहे. सतत पाण्याची मागणी होऊ लागली त्यानंतर युती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक १९ सप्टेंबर २०१९ ला दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी कोकणातून पाणी वळवण्याच्या योजनांना मान्यता दिली यात पार- गोदावरी वळण योजनेसाठी ९७ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय झाला होता. हा निर्णय होऊन ७ वर्षाचा कालावधी संपला तरी आजही हा निर्णय लाल फितीतच बांधून ठेवलेला आहे. नार खोऱ्यातील पाणी अडवल्यास मोठ्या प्रमाणात समुद्रात वाहून जाणारे पाणी उपलब्ध होणार आहे. हे पाणी तात्काळ देण्यात यावे अशी मागणी सरकारकडे छत्रपती संभाजी नगर येथील दिनांक १५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२६ या तीन दिवसीय धान्य आंदोलना प्रसंगी प्रा. सुशिलाताई मोराळे केली आहे. सकाळी २०१९ साली कोकणातील पश्चिम वाहिनी खोऱ्यातून १५५ टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त

▶▶ पान २ वर

# कवडगावच्या उपसरपंच पदी मकसूद भाई शेख यांची बिनविरोध निवड



**बीड नगरपरिषदचे गट नेते तथा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते फारुख भाई पटेल यांनी नवनिर्वाचित उपसरपंच व सर्वच ग्रामपंचायत सदस्य यांचा सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या गावच्या विकासासाठी मी आपल्या सोबत आहे असा शब्द देखील त्यांनी यावेळी दिला..**

**वडवणी | प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील उपसरपंच पदी मकसूद अली साजेद अली शेख यांची बिनविरोध सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.**

वडवणी तालुक्यातील कवडगाव हे पंचायत समिती सर्कलचे मोठे गाव असून या गावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतचे सर्वच सदस्य एकत्रित येत सर्वानुमते मकसूद भाई शेख यांची बिनविरोध उपसरपंच पदी निवड करण्यात आली आहे. यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच मकसूद अली साजेद अली शेख यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की गावच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन गावचा विकास करणार असल्याचे मत यावेळी व्यक्त केले यावेळी कवडगावचे

▶▶ पान २ वर

# खा.सोनवणेंच्या मध्यस्थीने देवगावकरांचे उपोषण मागे

**बीड | प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील देवगाव येथे १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराप्रकरणी आणि बोगस कामांच्या चौकशीच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी सुरू केलेले आमरण उपोषण अखेर खा.बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीनंतर मागे घेण्यात आले. दि.१८ रोजी खा.सोनवणे यांनी स्वत: उपोषणस्थळी भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी (सीईओ) चर्चा केल्यानंतर हे उपोषण सोडण्यात आले.**

देवगाव (ता.केज) येथील ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातून झालेल्या विकासकामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. याबाबत



गावकऱ्यांनी दिलेल्या अर्जानुसार, गावात प्रत्यक्षात कोणतेही काम न करता केवळ कागदोपत्री बोगस कामे दाखवून लाखो रुपयांचा निधी लाटण्यात आला आहे. ग्रामविकास अधिकारी पोटभरे, सरपंच आणि संबंधित ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी मिळून संगनमताने हा गैरव्यवहार केल्याचा आरोप असून, यापूर्वी झालेल्या चौकशीतही २ लाख रुपयांची कामे न करताच रक्कम उचलल्याचे निष्पन्न झाले होते असा गावकऱ्यांचा दावा आहे. या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी आणि ग्रामसेवकाला बडतर्फ करून ग्रामपंचायत कार्यालयाचे दप्तर सिल करावे, या प्रमुख मागण्यांसाठी गावकऱ्यांनी जिल्हा परिषद बीडसमोर आक्रमक भूमिका घेत उपोषणाचा इशारा दिला होता. गावकऱ्यांच्या या आंदोलनाची गंभीर दखल घेत

▶▶ पान २ वर

# नागेश विद्यालयाच्या समितीवर हाजी मुख्तार सय्यद यांची फेरनिवड

**पाटोदा | प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय, जामखेड येथील स्कूल कमिटीच्या सल्लागारपदी तसेच भौतिक सुविधा व विद्यार्थी सुरक्षा समितीच्या सदस्यपदी सामाजिक कार्यकर्ते हाजी मुख्तार सय्यद (जनता टेलर) यांची पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व समाजोपयोगी



कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

हाजी मुख्तार सय्यद हे पूर्वीपासूनच विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. समाजातील विविध प्रश्नांवर मुस्लिम पंच कमिटीच्या माध्यमातून सातत्याने काम करताना सामाजिक सलोखा, शिक्षण आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे योगदान राहिले आहे.

▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या आणि बीडचा पाणीप्रश्न सोडवा

## दुष्काळी सदृश्य परिस्थितीच्या आढावा बैठकीत आ.संदीप क्षीरसागरांची पालकमंत्र्यांकडे आग्रही मागणी

**बीड | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा आढावा व टचाईवर करावयाच्या उपाययोजनांबाबत बुधवारी (दि.१७) रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक भूमिका घेत शेतकरी आणि बीडकरांच्या विविध प्रलंबित मागण्यांचा धडाका लावला. पालकमंत्र्यांनी या मागण्यांची गंभीर दखल घेत सकारात्मकता दर्शवली असून लवकरच योग्य ती कार्यवाही करण्याचे



आश्वासन दिले आहे.

या बैठकीत, आ.संदीप क्षीरसागर यांनी बीडमधील पावसाच्या विषमतेवर बोट ठेवत, बीडमध्ये काही ठिकाणी पाऊस पडतो तर अवघ्या २ किलोमीटर अंतरावर पाऊस नसतो. त्यामुळे केवळ एका ठिकाणच्या पर्जन्यमानावर आधारित परिस्थितीचे मूल्यांकन न करता, प्रत्यक्ष गावनिहाय पावसाची स्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने दुष्काळी उपाययोजना कराव्यात आणि दुष्काळ जाहीर

▶▶ पान २ वर

### बीड शहराचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी थकबाकीचा विषय तातडीने मार्गी लावण्याची मागणी

बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मागील अनेक वर्षांपासून रखडला आहे. बीड नगरपरिषदेची महावितरणकडे मोठी वीज बिल थकबाकी आहे. यामुळे नवीन पाणी योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या विद्युत पुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने या विषयात तातडीने हस्तक्षेप करून महावितरणच्या थकबाकीचा प्रश्न सोडवावा आणि बीडकरांना सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठकीत केली. यावर पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी तात्काळ सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

# 'चेष्टा-मस्करीतही आक्षेपार्ह मजकूर शेअर करू नका अन्यथा कायदेशीर कारवाई-पोलीस उपनिरीक्षक निलेश केळे



**बीड | प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा वापर करताना विद्यार्थ्यांनी अत्यंत सतर्क व जबाबदार राहणे आवश्यक आहे. चेष्टा-मस्करीत अथवा गंमत म्हणूनही आक्षेपार्ह मजकूर, फोटो किंवा व्हिडिओ प्रसारित केल्यास थेट गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई होऊ शकते,असा स्पष्ट इशारा बीड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक निलेश केळे यांनी दिला.आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाच्या 'एकदंत गणेशाची आरती त्यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी ते विद्यार्थांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पसमध्ये एकदंत गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या उत्सवांतर्गत आयोजित

▶▶ पान २ वर

# शिवसेना अल्पसंख्याक आघाडीच्या जिल्हाअध्यक्षपदी हाजी आयुब पठाण व तर महिला अल्पसंख्याक जिल्हाध्यक्षपदी यास्मीन शेख

**बीड | प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते तथा मराठवाडा संपर्कनेते आमदार अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाध्यक्षपदी हाजी आयुबभाई पठाण व शिवसेना अल्पसंख्याक महिला जिल्हाध्यक्षापदी यास्मीनताई



शेख यांची निवड करण्यात आली असून त्यांना संभाजीनगर येथील आमदार अंबादास दानवे साहेब यांच्या संपर्क कार्यालयात दानवे साहेब यांच्या हस्ते व बीड जिल्हा संपर्कप्रमुख अशोकराव सकपाळ,नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख किशोर पोतदार साहेब, बीड जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत हाजी आयुबभाई पठाण व यासमीनताई यांचा यथोचित सत्कार करुन नियुक्तीपत्र देण्यात आले.यावेळी बोलताना आ. दानवे साहेब म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे शिवसेना पक्ष हा सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालत होते त्यांनी कधीही हिंदू मुस्लिम व अन्य अठरा पगड जातींच्या लोकांना वेगळं समजल नाही, साबीरभाई शेख यांच्यासारख्या मुस्लिम शिवसैनिकाला कॅबिनेट मंत्री करुन आम्ही मुस्लिम समाजाच्या कधीच विरोधात नाहीत

▶▶ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26